पुणे आवृत्ती
बातम्यांचा राजा
# जनप्रवास
मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.
RNI NO. MAHMAR/2013/57952
मंगळवार, दि. २९ एप्रिल, २०२५ | वर्ष : १३ | अंक : ११२ | पाने ८ | किंमत २ रुपये
www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ शुद्ध पाणी आरो प्लांट आणि कचरा व्यवस्थापन घोटाळा ?
४ प्रा. डॉ. भोर सर यांनी शिक्षण क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिले
५ प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्ण ताटकळत तर डॉक्टर गायब


पान ८ वर..

# पुणे विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी २०० एकर जागेची गरज: केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

## पुरंदरच्या विमानतळाचे काम भूमिपुत्रांचे मत विचारात घेऊन करण्याचे दिले आश्वासन

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : वाढत्या विमान प्रवाशांमुळे आगामी पन्नास ते शंभर वर्षांचा विचार करून पुणेविमानतळाचा विस्तार होणार आहे. त्यासाठी २०० एकर जागेची आवश्यकता असून, त्यातील २५ एकर जमीन सरंक्षण विभागाकडून घेण्यात येणार आहे, तर ६५ एकर खासगी जागेचे हस्तांतरण करण्यात येणार आहे. उर्वरित जागेसाठी चर्चा सुरू आहे, अशी माहिती केंद्रीय नागरी हवाई विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

पुणे विमानतळ सल्लागार समितीची बैठक आणि उड्डाण यात्रा कॅफेच्या उद्घाटनानंतर आयोजित पत्रकार परिषदेत मुरलीधर मोहोळ बोलत होते. यावेळी वडगाव शेरीचे आमदार बापूसाहेब पठारे, पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके, आदी उपस्थित होते.

मोहोळ म्हणाले, पुणे विमानतळ धावपट्टीच्या विस्तारासाठी ओएलएस सर्व्हे झाला असून, त्यानुसार सर्व विभागांसोबत बैठकी सुरू आहेत. धावपट्टी विस्तारासाठी साधारण २०० एकर जागेची आवश्यकता आहे. यामध्ये सरंक्षण विभागाकडे २५ एकर जमिनीची मागणी करण्यात आली आहे. त्या बदल्यात संरक्षण विभागाला दुसरीकडे जागा दिली जाणार आहे. या मागणीला सरंक्षण विभागाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. तसेच, खासगी ६५ एकर जागेबाबत बोलणी सुरू आहे. जागा संपादनाचे काम राज्य सरकारचे आहे. विमानतळाच्या शेजारचा रस्ता विमानतळ परिसरात येणार आहे. त्या रस्त्याला पर्यायी रस्ता तयार करावा लागणार आहे. त्यासाठी महापालिका ६५ कोटी रुपये खर्च करणार आहे.



तसेच कार्गोसाठी स्वतंत्र व्यवस्था असणार असल्याचेही मोहोळ यांनी नमूद केले.

उड्डाण योजनेंतर्गत छोटी शहरे मोठ्या शहरांना जोडली जात आहेत. गेल्या दोन वर्षांत देशभरात या योजनेंतर्गत दीड कोटी प्रवाशांनी प्रवास केला आहे. ही योजना पुढील १० वर्षे सुरूच असणार आहे. येत्या पाच वर्षांत या योजनेंतर्गत सुमारे चार कोटी प्रवासी विमान प्रवास करतील, असा विश्वासही मुरलीधर मोहोळ यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच, २०४७ पर्यंत देशात ४०० विमानतळ होतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुणेकरांचा मेट्रोला चांगला प्रतिसाद मिळत आहे. येत्या काळात शहराच्या कोणत्याही भागातून विमानतळापर्यंत येता यावे, यासाठी मेट्रोचे जाळे विमानतळापर्यंत जोडले जाणार आहेत. खडकवासला ते खराडी मेट्रो मार्ग पुढे विमानतळाला जोडण्याचा प्रयत्न राहणार आहे. त्यासंदर्भात महामेट्रोला डीपीआर तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे मेट्रो विमानतळासोबत जोडली जाईल.

तसेच पुरंदरविमानतळ प्रकल्पाला आमची जमीन द्यायचीच नाही, आम्हाला तुमचा प्रकल्प नको आहे. मात्र, शासन एकएक आदेश काढीत आहे; परंतु कोणत्याही परिस्थितीत प्रकल्प होऊ देणार नाही, तसेच सर्व्हे करणाऱ्या अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे सहकार्य करणार नाही, ड्रोन अथवा पीक पाहणी करू देणार नाही, असा निर्धार शेतकऱ्यांनी केला आहे. यावरून आता केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पुरंदरच्या भूमिपुत्रांवर कोणताही अन्याय केला जाणार नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. मोहोळ म्हणाले, पुरंदर विमानतळाच्या संदर्भात नव्याने कुठेही विमानतळ करायचं असेल, तर जागाही राज्य सरकार देते. एमआयडीसीच्या माध्यमातून ती जागा संपादित केली जाते. प्रत्येक गावाला एक उपविभागीय दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. भूसंपादनाची प्रक्रिया आता वेळ घेते लवकरच ते सुद्धा काम सुरू होईल. भूमिपुत्रांना न्याय हा दिलाच पाहिजे. आम्ही कोणीही त्या मताचे नाही, की भूमिपुत्रांना बाजूला ठेवून, किंवा त्यांचा मत विचारात न घेता काम करावं. पुणे पश्चिम महाराष्ट्र च्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे ते विमानतळ आहे, त्यामुळे भूमिपुत्रांवर कोणताही अन्याय केला जाणार नसल्याचे त्यांनी सांगितले आहे.

---

## संक्षिप्त

### मुंबईकरांवर पाणी कपातीचे संकट: पाणीसाठा २६ टक्क्यांवर

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : मुंबईकरांवर पाणी कपातीचे संकट निर्माण झाले आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावातील पाण्याच्या साठ्यात मोठ्या प्रमाणात घट निर्माण झाली आहे. कडक उन्हामुळे पाणी साठे, तलाव, धरणातील जलाशयांमधील पाण्याचे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होत आहे. तसेच मागणीही वाढली आहे. त्यामुळे पाणी साठा खालावत चालला आहे. याचा परिणाम पाणी पुरवठ्यावर होणार असून, येणाऱ्या काळात मनपा प्रशासनाकडून पाणी कपात करण्यात येण्याची शक्यता आहे.शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांत गेल्या महिनाभरात पाणीसाठ्यात झपाट्याने बदल झाल्याचे समोर आले आहे. महिनाभरात १६ टक्के घट झाल्याने आता तलावांतील साठा २६ टक्क्यांवर आला आहे. त्यामुळे मुंबईकरांवर पाणीकपातीचे संकट ओढवणार आहे.

मुंबई शहराची मोठ्या लोकसंख्येच्या घनतेमुळे या ठिकाणी पाण्याचा वापरही मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे प्रशासनाला या लोकसंख्येची पाण्याची गरज भागावावी लागते. तसेच पावसाळा सुरू होउन तलावात पाणी साठा होईपर्यंत या तलांवामधील पाण्याचे जून महिन्यापर्यंत नियोजन करावे लागते.महिनाभरापूर्वी पाणीसाठा ६ लाख १६ हजार दशलक्ष लिटर होता. तो आता ३ लाख ८८ हजार दशलक्ष लिटरपर्यंत खाली आला असून, त्यामध्ये १६ टक्के इतकी घट झाली आहे. त्यामुळे १४ मे पर्यंत सातही तलावातील पाणीसाठा १० टक्क्यांवर येईल, असे जल अभियंता विभागाकडून सांगण्यात येत आहे.पाण्याची वाढती घट लक्षात घेता लवकरच साठ्यासंदर्भात आढावा बैठक घेण्यात येणार आहे. तसेच जर पाणी कपात करायची असेल तर ती कधीपासून करायची याबाबतचा निर्णय या बैठकीत घेण्यात येणार आहे.

### राष्ट्रवादी शरद पवार गटाची सातारा जिल्हा कार्यकारिणी बरखास्त

जनप्रवास । प्रतिनिधी

सातारा : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची जिल्ह्यातील कार्यकारिणी व फ्रंटल सेलची कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणीची निवड लवकरच केली जाणार असल्याची माहिती जिल्हा सरचिटणीस राजकुमार पाटील यांनी दिली. आगामी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना मजबूत करण्याच्या दृष्टीने प्रदेशाध्यक्ष आ. जयंतराव पाटील यांच्या मान्यतेने व पशिचम महाराष्ट्र प्रभारी आ. शशिकांत शिंदे व जिल्हाध्यक्ष सुनिल माने यांच्या सुचनेनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

---

## पहलगाम हल्ल्यानंतर पुणे रेल्वे स्थानकावरील सुरक्षेत वाढ

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : काश्मीरमधील पहलगाम येथील बैसरान खोऱ्यात झालेल्या हल्ल्यानंतर रेल्वे प्रशासनही अलर्ट झाले असून, आता मध्य रेल्वेच्या पुणे विभागाकडून पुणे रेल्वे स्थानकासह विभागातील सर्वच स्थानकांवरील सुरक्षितेत आता वाढ करण्यात आली आहे. रेल्वे स्थानकांवर आता शस्त्रधारी रेल्वे सुरक्षा जवानांसह (आरपीएफ) डॉग स्क्वॉडचीही २४ तास गस्त ठेवण्यात आली आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर देशातील अनेक भागांत हल्ला होण्याची शक्यता आहे. अनेक भडकावू व्हिडीओ सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत. त्यामुळे शहरातील सार्वजनिक ठिकाणांवर आता अनुचित घटना घडण्याची शक्यता आहे.




हे टाळण्यासाठी आणि रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी शस्त्रधारी सुरक्षा जवानांसह डॉग स्क्वॉडची २४ तास गस्त ठेवण्यात आली आहे. डॉग स्क्वॉडद्वारे प्रवाशांच्या सामानासह रेल्वे गाड्यांची तपासणी केली जात आहे. तर शस्त्रधारी जवान स्थानकावर आणि प्रवाशांवर बारीक लक्ष ठेवून आहेत. संशयास्पद कोणी आढळल्यास त्याची कसून चौकशी केली जात आहे.

---

## बनावट नोटा छापण्याचं मोठं रॅकेट उद्ध्वस्त

### २८ लाखांच्या ५०० अन् २०० च्या बनावट नोटा जप्त

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : पुण्यात पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल २८ लाख ६६ हजार १०० रुपये किंमतीच्या बनावट नोटा पकडल्या आहेत.याप्रकरणी पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींमध्ये दोन महिलांचाही सहभाग आहे.पोलिसांनी आरोपींकडून एक प्रिंटर मशीन तसेच ५०० आणि २०० रुपयांच्या नोटांचे प्रिंटेड गठ्ठे हस्तगत करण्यात आले आहेत.मनीषा ठाणेकर, भारतीय गवंड, सचिन यमगर,नरेश शेट्टी, प्रभू गुगलचड्डी अशी अटक करण्यात आलेल्या





आरोपींची नावं आहेत.बँकेत बनावट नोटा जमा केल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.त्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला आणि या प्रकरणाचा पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी २८ लाख ६६ हजार १०० रुपयांच्या प्रिंट केलेल्या बनावट नोटा आणि २ लाख ४ हजार रुपयांच्या खऱ्या नोटा जप्त केल्या आहेत.पोलिसांनी पाच आरोपींना बेड्या ठोकल्या असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना न्यायालयात हजर केले जाणार आहे.बनावट नोटा तयार करणांऱ्यामध्ये आणखी कुणाचा हात आहे का? याचा तपास करण्यात येत आहे. बनावट नोटा सापडल्यामुळे पुण्यात नेमकं काय चाललंय? असा सवाल उपस्थित होत आहे.

---

## दागिने घडविणाऱ्या कारागिराला लुटले; सोन्याची तार चोरून चोरटे पसार

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : सराफ व्यावसायिकांना दागिने घडवून देणाऱ्या कारागिराला चोरट्यांनी लुटल्याची घटना रविवार पेठेत घडली. कारागिराशी झटापट करुन तीन लाखांची सोन्याची तार चोरून चोरटे पसार झाले. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध फरासखाना पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत भरत देवाराम मिना (वय १८, सध्या रा. लक्ष्मी डायिंग कटींग शॉप, रविवार पेठ) याने फरासखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, दोन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्य माहितीनुसार, रविवार पेठेत सराफी पेढींना दागिने घडवून देणारे व्यावसायिक आहे. मिना तेथे कारागिर म्हणून काम करतो. शनिवारी (२६ एप्रिल) सायंकाळी साडेसातच्या सुमारास तो रविवार पेठेतून सायकलवरुन निघाला होता. त्याच्याकडे तीन लाख २२ हजार रुपयांची सोन्याची बारीक तार होती. ही तार तो कारागिर कमल मंडल याला देण्यासाठी निघाला होता. मोती चौक परिसरातील पावटेकर ब्रदर्स अँड सन्स या सराफी पेढीसमोर सायकलस्वार मिना याला चोरट्यांनी अडविले. त्याच्याशी झटापट करुन चोरट्यांनी त्याच्याकडील सोन्याची बारीक तार चोरुन चोरटे पसार झाले. पोलीस उपनिरीक्षक हाळे तपास करत आहेत.

---

## 'लोहगाव ४२.८ अंश'

### राज्यात सर्वाधिक तापमानाची नोंद

जनप्रवास । प्रतिनिधी



पुणे : विदर्भातील काही भागांतील कमाल तापमानाचा पारा काहीसा उतरला असून अमरावती, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ या भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ५० ते ६० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. त्यामुळे या सात जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, मध्य महाराष्ट्रातील हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे.

राज्यात मध्य महाराष्ट्रातील काही भागांसह मराठवाड्यातील कमाल तापमानात १ ते २ अंश सेल्सियसने घट झाली. मध्य महाराष्ट्रात कोल्हापूर, नाशिक, सांगली, सातारा तसेच सोलापूरसह विदर्भात नागपूर, गोंदिया, वर्धा आणि यवतमाळ भागातील तापमानाचा पारा उतरला आहे. मराठवाड्यात धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि बीडने तापमानाची चाळिशी ओलांडली आहे. राज्यात पुण्यातील लोहगाव येथे ४२.८ अंश सेल्सियस नोंदविले गेले. पुढील दोन दिवसांत परभणी व हिंगोलीमधील तुरळक ठिकाणी हवामान उष्ण व दमट राहण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे.

पुणे ४०.६, अहिल्यानगर ४०.८, जळगाव ४२.३, नाशिक ३९.८, सांगली ३८.४, सातारा ३९.७, सोलापूर ४०, छत्रपती संभाजीनगर ४१.८, परभणी ४२.४, अमरावती ४१.२, चंद्रपूर ३८. २, नागपूर ३९.२, वर्धा ३९.९, यवतमाळ ३८.८

---

## वेगवेगळ्या अपघातांत दोघांचा मृत्यू

### स्वारगेट आणि खेड तालुक्यात गुन्हे दाखल

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : गुलटेकडी परिसरात जुने सुरुची उपाहारगृह याठिकाणी हॉटेलमध्ये जेवणाचे पार्सल आणण्यासाठी यलप्पा अर्जुन पोटे (वय ४२) हे मुलासह गेले होते. त्यांनी मुलास हॉटेलमध्ये थांबवून लघवी करण्याकरता सार्वजनिक मुतारीकडे जात असताना, डायसप्लॉटचा बाजूने लक्ष्मीनारायण चौकाकडे जाणाऱ्या भरधाव टेम्पोने त्यांना धडक दिल्याने त्यामध्ये त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचा प्रकार घडला आहे. या प्रकरणी टेम्पो (एमएच १२ जीटी ९३८४) चालकाविरोधात स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मयताचा मुलगा सुमित यल्लाप्पा कोठे (वय १९) पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. याबाबत पोलीस उपनिरीक्षक एन आल्हाटे पुढील तपास करत आहे.

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात सोळु या ठिकाणी आळंदी ते मरकळ रोडवर टाटा कंपनीचा टेम्पो एम एच १४ कीक्यू ९६५७ यावरील चालक शरद शेषराव सुर्वे यानी त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात चालवून त्यानी विशाल सुधाकर राठोड (वय २५) व रवींद्र बाबूसिंग आडे (वय ४४, रा. सिल्कसिटी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर) यांच्या ताब्यातील बजाज डिस्कव्हर या गाडीस पाठीमागून जोरात धडक दिली.यामध्ये त्याचा मृत्यू होऊन दुचाकी नुकसानीस टेम्पो चालक कारणीभूत झाला आहे.

---

## सिंहगड रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी

### ६ किमीपर्यंत वाहनांच्या रांगा

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : मुंबई पेक्षाही भयानक अशी वाहतूक कोंडी सध्या पुण्यातल्या सिंहगड रस्त्यावर पाहायला मिळत आहे. त्यामुळे पुणेकरांना आठवड्याच्या पहिल्याच दिवशी मोठा मनस्ताप सहन करावा लागतोय. मुंग्यासारख्या गाड्या आणि हॉर्नच्या कर्कश आवाजमुळे सिंहगड रस्त्यावर प्रवास करणारा प्रवासी त्रस्त झाला आहे. पुणेकरांना या वाहतूक कोंडीत तब्बल चार तास अडकून पडावं लागलं. यावेळी सिंहगड रस्त्यावर वाहनांच्या ६ किलोमीटरपर्यंत लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या.

कोथरूड, कर्वेनगरकडे जाणारा राजाराम पुलाचा एक भाग दुरुस्तीसाठी बंद केल्यामुळे सिंहगड रस्त्यावर ट्राफिकची महाकोंडी झालेली दिसत आहे. यावेळी कालव्यालगतचा पर्यायी रस्ता आणि मुख्य सिंहगड रस्त्यावर वाहतूक कोंडी पाहायला मिळाली. यावेळी मोठ्या प्रमाणात वाहनं अडकून पडलेली दिसून आली. ही



समस्या सुटावी यासाठी दुसरा टप्प्यातील फन टाईमकडे जाणारा उड्डाणपूल हा लवकर सुरू करावा अशी मागणी करण्यात आली आहे. परंतु भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचा टाइम मिळत नसल्यामुळे पूल असाच रखडून पडला आहे. या प्रकरणी आता मनसेने आंदोलनाचा इशारा दिला आहे.

सिंहगड रस्त्यावरील विठ्ठलवाडी ते फन टाईम उड्डाणपूल येत्या सात दिवसांत सुरू करण्यात यावा, अन्यथा मनसे स्टाईल आंदोलन करून पूल खुला करणार असल्याचे पत्र मनसे शिष्टमंडळाने महापालिकेला दिले आहे. सिंहगड रस्ता उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले आहे. मात्र, भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची उद्घाटनासाठी वेळ मिळत नसल्याने मुद्दामहून पुलाची किरकोळ कामे बाकी ठेवण्यात आली आहेत, असा आरोप केला जात आहे. एका दिवसांत होणारी किरकोळ कामं बाकी असताना महापालिका पूल सुरू करण्यास वेळकाढूपणा का करत आहे, असा सवाल मनसे पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला आहे.

वाहतुकीचा हा प्रश्न सोडवण्यासाठी काही वर्षांपूर्वी राजाराम पूल ते फनटाईमपर्यंत उड्डाण पुलाचे काम सुरू करण्यात आले होते. उड्डाणपूल मार्च महिन्यामध्ये वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल, असे आश्वासन प्रशासनाने दिले होते. परंतु एप्रिल महिना संपायला आला तरी हा उड्डाणपूल खुला करण्यात आलेला नाही. सिंहगड रस्त्यावरतील वाहतुक कोंडीचा प्रश्न गंभीर बनलेला असून पुणेकरांना अनेक तास अडकून पडावे लागते आहे.

---

## हॉर्न वाजविल्याच्या वादातून बेदम मारहाण

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : हॉर्न वाजविल्याच्या वादातून टोळक्याने भाऊ-बहिणीला बेदम मारहाण केल्याची घटना भवानी पेठेतील गुरुनानकनगर परिसरात घडली. टोळक्याने तरुणाच्या डोक्यात दगड घातला. या घटनेत तिघे जण जखमी झाले.

खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी खडक पोलिसांनी टोळक्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. टोळक्याने केलेल्या मारहाणीत करण ललित केसवाणी (वय २८), भाऊ हर्ष आणि बहीण निकिता हे जखमी झाले आहेत. टोळक्याने करण यांचे आजोबा भारत यांना शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अग्रलेख : चुना कोणी कुणाला लावला...?

रोखठोक महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार कधी काय बोलतील याचा नेम नसतो. बऱ्याच वेळा वादग्रस्त विधाने करून ते अडचणीत येतात. मागे एकदा पाणीप्रश्न निर्माण झाला तेव्हा दादा सहज म्हणाले होते, 'धरणातच पाणी नाही मग मी काय करू.' एकदा पत्रकारांना बाईट देताना आपल्या पक्षाच्या रूपाताई चाकणकरांना म्हणाले, रूपाताई थोडं मागे सरका, एवढं चिकटून का उभ्या आहात! असो !! नुकतेच त्यांनी पीक विम्याबद्दल एक मोठे विधान केले. अजित पवार म्हणाले, मागे आम्ही एक रुपयामध्ये पीक विमा देण्यास सुरुवात केली होती. ती स्कीम आम्हाला अडचणीत आणणारी ठरली. आपल्या ग्रामीण भागातील भाषेत सांगायचं झालं तर त्यात काही लोकांनी आम्हाला चुना लावला, असं ते म्हणाले.

ते म्हणाले, आता जे तुमच्या भल्याचं आहे ते आम्ही करणार आहोत. ते पुढे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मी स्वतः, माणिकराव कोकाटे अशी बैठक झाली. यातून काही नवीन कल्पना आणि चांगला कार्यक्रम देण्याचा आमचा प्रयत्न आहे. तुम्हाला प्रोत्साहनपर काही गोष्टी आम्ही करणार आहोत. अर्थात याबाबत तुम्हाला अंधारात ठेवण्याचे काही कारण नाही, साऱ्या महाराष्ट्राला हे आम्ही सांगू. या योजनेत, आलेल्या अडचणींनंतर लवकरच नवीन योजना आणणार असल्याचे संकेत अजित पवारांनी दिले. मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत चर्चा करून लवकरच घोषणा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. एक रुपयात पीक विमा योजनेला शेतकऱ्यांनी चुना लावला, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

त्यानंतर विकासकामांसंदर्भातील बैठकीकरता ते परभणीत आले तेव्हा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावरच युवक काँग्रेस व किसान सभेच्या कार्यकर्त्यांनी पवारांच्या गाड्यांचा ताफा अडवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी कार्यकर्त्यांना अडवल्यानंतर त्यांनी पवार यांच्या ताफ्यावर चुन्याच्या डब्या फेकत घोषणाबाजी केली. पवार यांनी त्यांच्या वक्तव्याबद्दल शेतकऱ्यांची जाहीर माफी मागावी व पीक विमा घोटाळ्यात सहभागींवर कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी चुनाफेक आंदोलन करण्यात आले. पोखर्णी येथे नृसिंहाचे दर्शन घेऊन उपमुख्यमंत्री पवार जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीसाठी येत होते. तेव्हा आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर त्यांच्या ताफ्यासमोर चुन्याच्या डब्या फेकल्या.

वास्तविक सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नाही, सोयाबीनला ६ हजार रुपये भाव देण्याचे आश्वासन पाळले नाही. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनीच महाराष्ट्राच्या मतदारांना चुना लावला आहे. तसे पाहता पीक विमा कंपन्यांनी मागील पाच वर्षांत ५० हजार कोटी रुपयांची कमाई केली. महाराष्ट्रात दररोज पाच ते सहा शेतकरी आत्महत्या करीत आहेत. अर्थ मंत्रालयाने सामाजिक न्याय विभागाचा निधी कपात करून राज्यातील मागासवर्गीय समुदायाला चुना लावला आहे, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. परभणी जिल्ह्यातच माळसोन्ना या गावी एका तरुण शेतकऱ्याने आत्महत्या केल्यानंतर त्याच्या पत्नीनेही आत्महत्या केली. एकाच कुटुंबात या दोन आत्महत्या घडल्यानंतर या कुटुंबियांना भेट द्यायला अजित पवारांना वेळ नाही, पण आपल्या निकटवर्तीयांना टेंडर मिळवून देण्यासाठी ते परभणीत आले आहेत, असा आरोप काँग्रेसच्या अमोल जाधव यांनी केला.

रोखठोक बोलण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या अजित पवार यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबाबतही आपले मत व्यक्त केले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात या योजनेवरून वातावरण तापलं आहे. विधानसभा निवडणुकीवेळी तत्कालीन महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेची घोषणा केली होती. या योजनेतून सुमारे २ कोटी महिलांना १५०० रुपयांची आर्थिक मदत दर महिन्याला केली जात होती. निवडणूक काळात महायुतीच्या नेत्यांनी पुन्हा सरकार आल्यास लाडक्या बहिणींना २१०० रुपयांची मदत देऊ, अशी घोषणा केली होती. यानंतर राज्यात महायुतीचेच सरकार आले. पण त्यानंतर लाडकी बहीण योजनेचे निकष पाळले आहेत की नाही यासाठी अर्जाची छाननी सुरू करण्यात आली. या छाननीतून लाखो महिला या आधीच अपात्र ठरल्या आहेत. त्यानंतर राज्यातील लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या केवळ ८ लाख महिलांना १५०० ऐवजी केवळ ५०० रुपयांचा लाभ मिळणार आहे. यावर विरोधकांनी राज्य सरकारवर निशाणा साधला. त्यानंतर अर्थमंत्री अजित पवार प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणाले, आमचं म्हणणं आहे की, कुठल्याही एका योजनेचा लाभ घ्यावा. महिलांना केंद्राची योजना मिळेलच. केंद्राच्या योजनेचा आणि राज्य सरकारचा अर्थात काही संबंध नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील शेतकऱ्यांसाठी योजना दिली आहे. हा लाभ मिळत नसेल तर दीड हजार रुपयांचा लाभ घ्यावा. कुठला लाभ मिळवायचा ते निश्चित करण्याचं आपण आपल्या लाडक्या बहिणींवर सोपवलं आहे. जागतिक आर्थिक संकटावर भाष्य करताना अजित पवार म्हणतात, अमेरिकेने आयात शुल्क वाढवल्याने अनेक देशांवर परिणाम झाला आहे. कोरोनानंतर आता हे नवे संकट समोर आले आहे. पण पंतप्रधान मोदी यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर जोडलेल्या संबंधाचा फायदा भारताला नक्कीच होईल. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रौप्यमहोत्सवी वर्षात आपली दिशा व ध्येय स्पष्ट करताना अजित पवार म्हणतात, सर्व समाजाला सोबत घेण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे. मात्र, राजकारण आणि कंत्राटदारी यांची गल्लत करू नका. ज्यांना राजकारण करायचे आहे त्यांनी मक्तेदारी करू नये आणि ज्यांना कंत्राटदारी करायची आहे त्यांनी राजकारण करू नये, दोन्हीपैकी काय स्वीकारायचे यावर विचार करा. एकाच वेळी दोन्हीही करू नका..... अर्थात हे सर्व ठीक आहे, पण अजितदादा म्हणतात त्यांना चुना लावला, वास्तविक सरकार जनतेला चुना लावते त्याचे काय?

# राजधानीतून

## ईडी कार्यालयाची आग विझली; संशयाचा धूर कायम

### सत्ताधारी-विरोधकांकडून फैरी

मुंबईतील सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) कार्यालयाला आग लागल्याची घटना नुकतीच घडली आहे. यानंतर विरोधकांकडून यावरून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. ही आग लागली की लावण्यात आली याबद्दल शंका उपस्थित केल्या जात आहेत.

या आगीत महत्त्वाच्या प्रकरणांचे पुरावे गहाळ झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. यादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड, खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील यावरून प्रश्न उपस्थित केले आहेत.

सुप्रिया सुळे, जितेंद्र आव्हाड यांच्या मते भाजपने काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेनेच्या दिग्गज नेत्यांना ईडीच्या बडग्याने आपल्या वळचणीला म्हणजेच सत्तेत सामिल करून घेतले आहे. अनेक नेत्यांवर हजारो कोटी रुपयांच्या घोटाळ्यांचे आरोप भाजपनेच केले होते. त्यातून त्यांच्या मागे ईडीची पिडा लावली होती. त्याच्या नोटिसा आणि त्यातून चौकशांसाठी अनेकांना कार्यालयात फेरेही मारावे लागले होते. परंतु ते सर्वजण भाजपकडे फिरताच मशिनमधून व्हाईटवॉश होऊन निघाले आहेत. अशा परिस्थितीत त्यांना ईडीकडून क्लिनचिटही देण्यात आली आहे. त्यामुळे तेथील कागदपत्रांची अडगळ काय कामाची?




अनेक विरोधी पक्षाने या आगीचा पंचनामा सुरू केला आहे. आता ईडीला काही कामच राहिलं नाही. शिवाय ही कागदपत्रे उद्या कुणाच्या हाती लागू नये यासाठीच हा आगीचा उद्योग करावा लागला असावा, असा आरोप होत आहे.

ईडीच्या कार्यालयामध्ये आग लागणं ही खूप गंभीर गोष्ट आहे. जिथे पार्किंगचा प्रश्न नाही, रस्ता मोठा आहे, तिथे आग लागल्या लागल्या कितव्या मिनिटाला आगीचा बंब पोहचला? एवढं एआय आणि तंत्रज्ञान सुरू आहे मग या फाईल जळाल्यातर त्याचा बॅकअप असला पाहिजे, नसला तर हे धक्कादायक आहे. एकतर आग कशी लागली? वेळेत विझवली का गेली नाही? याची उत्तर बीएमसीला द्यावी लागतील.

काँग्रेसचे नेत्यांनी देखील या आगीच्या घटनेवरून सरकारवर संशय व्यक्त केला आहे. सब गोलमाल है भाई सभ गोलमाल है, सीधे रस्ते की ये टेढी चाल है असं म्हणण्याचा प्रसंग शेवटी आलाच. ईडीने स्वत:चेच कार्यालय जाळून घेतले. आता कुठलेच पुरावे नाहीत हा कांगावा करण्याकरिता आग लावून हे मोकळे झाले आहेत. राजकीय कारस्थान कसं असतं याचा हा अत्यंत दृष्ट नमुना आहे, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे नेते हर्षवर्धन सकपाळ यांनी दिली आहे.

### ईडी कार्यालयातील सर्व कागदपत्रे सुरक्षित : फडणवीस

आगीच्या या घटनेवरून विरोधक संशय व्यक्त करत असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खुलासा केला. ते म्हणाले, ईडीच्या कार्यालयाला आग लागली असली तरी तिथली कागदपत्रे सुरक्षित आहेत. ते म्हणाले की, मी मुंबईतील ईडीच्या अधिकाऱ्यांशी बोललो त्यांनी मला सांगितलं आहे की कार्यालयातील प्रत्येक कागद सुरक्षित आहे. त्या कागदपत्रांचे मिरर इमेजिंग स्टोरेज देखील आहे. या आगीमुळे कार्यालयातील कुठल्याही कागदाला केसाचाहही धक्का लागलेला नाही, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

आग लावली का लागली हे परमेश्वराला माहिती, पण कालचक्र उलटं फिरून आलं ना? शॉर्ट सर्किटमुळे मंत्रालयाला लागलेली आग जणू काय त्यावेळचे मुख्यमंत्री यांनीच जाऊन सहव्या मजल्यावर लावली होती अशीच बोंबाबोंब त्यावेळचे विरोधपक्ष आणि आत्ताचे सत्ताधारी करत होते. आता म्हणायला जागा आहे. त्यांचे पूर्वी दुसरीकडे असलेले नेते, ईडीत अडकून सत्ताधारी पक्षात गेले, त्यामुळे संशयाला जागा आहे, त्यामुळे आग लावली असेल, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले.

**राजधानीतून**

# अंतरंग

## जल है तो कल है...!

पाणी अडवा, पाणी जिरवा ही म्हण फक्त कागदावरच राहिली आहे. दिवसेंदिवस पाणी संकट गडद होत चाललंय, याचे संकेत मिळत असताना तुम्ही-आम्ही पाणी बचतीकडे दुर्लक्ष करत आहोत. विशेष करून मुंबईतील बहुतांश भागात पाणी उपलब्ध होत असल्याने पाणी बचतीला आपणच हरताळ फासला आहे. ग्रामीण भागातील प्रत्येकाला पाणी उपलब्ध व्हावे यासाठी जल जीवन मिशन योजनेची अंमलबजावणी करण्याची ओरड झाली. मात्र जल जीवन मिशन योजना संथगतीने का वाहत आहे, याचे उत्तर सरकारच देऊ शकेल. पिण्याच्या पाण्याचे संकट लक्षात घेता 'आजची बचत उद्याची गरज' बनली आहे. त्यादृष्टीने उपाययोजनेची गरज आहे. एकूणच 'जल है तो कल है' म्हणण्याची वेळ आली आहे.

गेल्या काही वर्षांत वातावरणीय बदलामुळे पाऊस लहरी झाला आहे. त्यामुळे राज्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरण क्षेत्रातही पावसाचे आगमन उशिरा होते आणि जनतेला पावसाच्या मोसमात पाणी कपातीला सामोरे जावे लागते. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत पाणीबाणी स्थिती निर्माण झाली तर त्याची ओरड होते. नळाला पाणी आले, काम झाले, तर नळ बंद करणे हे खास करून मुंबईकरांच्या स्वभावातच नसावे. त्यामुळे मुंबईत पाण्याला फारसे गांभीर्याने घेतले जात नाही. मात्र पाणी हे अनमोल आहे, याची जाणीव ग्रामीण भागातील पाण्याची भयावह स्थिती बघितल्यानंतर येते. पाण्याचा अपव्यय टाळणे हे तुम्हा-आम्हा सर्वांच्या हातात. मात्र पाणी वाया घालवणे हा आपल्या सवयीचा जणू भागच झाला आहे. त्यामुळे पाणी वापराचे ऑडिट अनिवार्य ही काळाची गरज आहे. पाणी हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे; मात्र भविष्यात रोजच्या पाणीपुरवठ्याच्या मागणीत वाढ होण्याचे संकेत वाढत्या लोकसंख्येमुळे मिळू लागले आहेत. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळत पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही, यासाठी प्रशासनाबरोबर प्रत्येकाने पुढे येणे गरजेचे आहे. विशेष करून मुंबईसाठी समुद्राचे पाणी गोडे करणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पिण्यायोग्य उपलब्ध करणे यासाठी पालिका प्रशासनाने नियोजनबद्ध प्रयत्न केले तर भविष्यात पाणीबाणी परिस्थिती ओढावणार नाही, याचा विचार प्रशासनासह तुम्ही-आम्ही करणे उद्याची गरज आहे. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. यामुळे मुंबईला प्रत्येक गोष्टीत प्राधान्य दिले जाते.

मुंबईत पाणीबाणी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी राज्य सरकारकडून राखीव पाणीसाठा उपलब्ध करून दिला जातो. परंतु राज्यातील अनेक भागात पाण्याची ओरड होत असते. अनेक जिल्हे पाण्यासाठी व्याकुळ असून एक-दोन दिवस आड पाणी मिळते. त्यामुळे ग्रामीण भागात तर पाण्यासाठी कशा प्रकारे लढा द्यावा लागतो याचा विचारही डोळ्यांतून पाणी आणणारा आहे. दुसरीकडे ग्रामीण भागातील पाण्याची गरज, धरण क्षेत्रातील पाण्याच्या पातळीत होणारी घट लक्षात घेता जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनीही पाण्याचे ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. वातावरणीय बदलामुळे पाऊसही लहरी झाला असून, भविष्यात पाणी संकट गडद होण्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे पाण्याची आजची बचत उद्याची गरज असे म्हणणे वावगे ठरणार नाही. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत पाणीबाणी स्थिती ओढवली तर तातडीने उपाययोजना करण्यासाठी संपूर्ण यंत्रणा कामाला लागते. पाणी प्रत्येकाला मिळावे यात दुमत नाही; मात्र ग्रामीण भागात पुरेशा पाण्याची कमतरता ही एक कायमची समस्या निर्माण झाली आहे. उन्हाळा सुरू होताच दरवर्षी राज्याच्या विविध भागांतून पिण्याच्या पाण्याचे संकट तीव्र होत असल्याचे वृत्त येते. एप्रिल मे महिन्यात तर ग्रामीण भागातील लोकांना पाण्यासाठी पायपीट करावी लागते. ग्रामीण भागातील प्रत्येकाला पाणी यासाठी जल जीवन मिशन योजना अंमलात आणली. ग्रामीण भागात प्रत्येकाच्या घरात पिण्याच्या पाण्याचे थेट नळ कनेक्शन व्हावे म्हणून केंद्राने सुरू केलेल्या जल जीवन मिशन या योजनेसाठी महाराष्ट्र राज्य सरकारने कोट्यवधी रुपये खर्च केले. मात्र केंद्र सरकारने सुरू केलेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेला महाराष्ट्रातील तालुक्यात घरघर लागली आहे. त्यामुळे पाणी हे जीवन असून पाण्यात चोरी म्हणजे जनतेच्या सहनशीलतेचा उद्रेक होणार आणि याला तुम्ही-आम्ही सगळेच जबाबदार असणार हे कोणी नाकारू शकत नाही.

मात्र आजच्या घडीला पिण्याच्या पाण्याची भयंकर टंचाई जाणवू लागली आहे. राज्यात पिण्याच्या पाण्याची भयावह स्थिती निर्माण झाली की टँकरचालक घात लावून बसलेलेच असतात. ग्रामीण भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असला तरी एखाद्या भागात टँकर पोहोचला की पाण्यासाठी लोकांची तोबा गर्दी होते. जेमतेम एक-दोन हांडे पाणी मिळाले तरी गावकरी विशेष करून महिला समाधान व्यक्त करतात. मात्र टँकरचालकांचे भले होत असल्याने हर घर जल पद्धत अंमलात आणत टँकर पद्धत मोडीत का काढली जात नाही. पाण्याचा असाच अपव्यय सुरू राहिला तर एका बादलीसाठी तुम्हा आम्हाला पैसे मोजावे लागणार हेही तितकेच खरे.

**- अविनाश पाटणकर**

# पंचांग

मंगळवार विक्रम संवत्- २०८१
वैशाख शके संवत्- १९४७
संवत्सर विश्वावसूनाम अयन- उत्तरायण
मास- वैशाख ऋतु- ग्रीष्म
शुक्ल पक्ष तिथि:द्वितीया १७:३१:२२
नक्षत्र:कृत्तिका १८:४६:५४ योग:सौभाग्य १५:५३:२०
करण:बालव ०७:१९:१९ करण:कौलव १७:३१:२२
करण:तैतिल २७:४८:३५+ सूर्य:मेष चन्द्र:वृषभ०२:५३:२६
हिजरी सन् - १४४६ मुस्लिम मास -शव्वाल तारीख - ३०

# राशी भविष्य...

**मेष** – शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व. मान सन्मान वाढणार आहे. कार्यात येणारे विघ्न दूर होतील. बाहेरच्या लोकांमुळे फायदा होईल. जोखमीचे कामे करू नका.

**वृषभ** – शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर. आपण केलेल्या कार्यामुळे स्वत:ला फायदा होईलच त्या बरोबर समाजाचा देखील फायदा होईल. जमीन, वहान, मशनरी संबंधीत चांगले योग आहेत. परिवारात वाद करू नका.

**मिथून** – शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व. शुभ कार्याला सुरुवात करण्याचे योग आहेत. मनस्थिती चंचल होऊ देऊ नका. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. वाईट व्यसनांपासून दूर रहा. प्रवास टाळा.

**कर्क** – शुभ रंग:लाल, शुभ दिशा: उत्तर. मित्रांच्या सहकार्याने फायदा होईल. स्थावर प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने राहील. संत लोकांचा सहवास लाभेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**सिंह** – शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण. महत्वाची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. एकद्या व्यक्तीच्या सहवासामुळे आपल्या जीवनात बदल घडून येईल. जीवनसाथी बरोबर प्रेमळपणे वागा.

**कन्या** – शुभ रंग:काळा, शुभ दिशा:दक्षिण. समाजात आपल्या कामाची स्तुती होईल. धार्मिक कामाकडील ओढा वाढेल. ओळखीचा फायदा होईल. घर, जमीन विकत घेण्याचा योग आहे. डोळ्याचा आजार संभावतो.

**तूळ** – शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पूर्व. अचानक यश मिळाल्याने मन प्रसन्न राही. कौटुंबिक समस्या हल होतील. आपल्या वाईट व्यसनांपासून दूर रहा.अनावश्यक खरेदी होईल.

**वृश्चिक** – शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पूर्व. सामान्य स्तरावरचे कामे होतील. योजना सफल राहतील. समाजात यश आणि प्रतिष्ठा वाढेल. दिखाव्यापासून दूर रहा. व्यापारात, नोकरीत लाभदायक योग आहे.

**धनू** – शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा:दक्षिण
शुभ बातम्या कळाल्यामुळे दिवस चांगला जाईल. राजकारणापासून दूर रहा. पारिवारीक समस्या सुटतील. प्रवास सुखकारक होईल.

**मकर** – शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर
कामामध्ये यश न मिळाल्याने निराशा येईल. कोणाच्याही मदतीची अपेक्षा करू नका. नवीन संधी मिळणार नाही. कौटुंबीक वातावरण सामन्य राहील.

**कुंभ** – शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:उत्तर
फायदेशीर प्रेरणा मिळणार आहे. शुभ कार्यात सामील होण्याचा योग आहे. आर्थिक खर्च वाढणार आहे. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

**मीन** – शुभ रंग:लाल,शुभ दिशा:उत्तर
कामामध्ये यश न आल्यामुळे आपल्याला चिंता सतावेल. भाऊ, मित्र यांच्या बोलण्यामुळे मन दुखावेल. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता.

# पारावरचा फड

दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये २८ पर्यटकांचा बळी घेतला. यामुळे भारत-पाकिस्तानमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. भारतानेही सिंधू जलकरार रद्दसह अनेक घोषणा केल्या. परंतु या हल्ल्याला आठवडा पूर्ण होतो न होतो तोच आता सत्ताधारी आणि विरोधकांतून या हल्ल्याच्या वादाचे आणि त्यातून आरोप-प्रत्यारोपाचे राजकारण पेटले आहे. त्या हल्ल्यात म्हणे दहशवाद्यांनी हिंदूंना विचारून, हेरून मारले असे चित्र निर्माण झाले. दुसरीकडे या हल्ल्यात मुस्लिमही ठार झाले आहेत, ते समोर आले नसल्याचा विरोधकांकडून आरोप होऊ लागला आहे. या हल्ल्याचे हिंदुतत्ववादी राजकारण आणि बिहार निवडणुकीचे कनेक्शन असा संशय व्यक्त करीत जाणते नेते शरद पवार यांनी हा आरोप केला तो विरोधकांनी 'लाईटली' घेतला. पण काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी काश्मीरमध्ये जावून जखमींची विचारपूस केली, काँग्रेसनेते विजय वडेट्टीवार यांनीही या हल्ल्याचे राजकारण करून जातीयवाद पेरला जात असल्याचा आरोप करताच भाजपकडून एकेरीवर येत विरोध होऊ लागला आहे, एकूणच यासंदर्भात पारावरची चर्चा...!

**पांडूनाना :** आरं त्या काश्मीरात पर्यटकांचा हाकनाक दहशतवाद्यांनी बळी घेतला आन् राजकारन पेटलंया.

**बाबूराव :** खराय तुजं, मला सांग? दहशतवादीच ते, त्यानास्नी कंच्या जाती-धरमाची आन् देवादिकाची चाड हाय का? म्हनं त्यांनी हिंदुंना ईचारून मारलं म्हनं?

**पांडूनाना :** आरं, त्यानास्नी फकस्त पाकिसतान आन् दहशतवादच कळतुया. ते गोळ्या झाडायचं काम करत्याल का धरम ईचारत्याल?

**बाबूराव :** व्हय, आन् तिथंपातुर पोहोचल्यावं त्यांच्या जीवाची भीती हायच की? काशमीरात जवान, पोलिसाच्या हाती लागू नये हे बगनारच न्हवं?

**पांडूनाना :** आता यंतरनंला ती घुसत्यात याची म्हाईती मिळू नये हे नवलंच. पन त्याचं बी जाती-धरमाचं राजकारन व्हाय लागलं ही शंका येनारच की?

**बाबूराव :** बरं, बिहारच्या निवडनुकीआदी हिंदू-मुसलीम राजकारन पेरायचा वाचाळवीरांनी आगुदरच परयत्न केलायच की? आता काश्मीरचं कोलित नवं?

**पांडूनाना :** मग ह्याबाबत कुनी बोलू बी नये का?

**बाबूराव :** आरं भाजपसमोर कुनी काय बोलायचं न्हाय? ते करत्याल ते समदं चांगलंच?

**पांडूनाना :** बरं काय का आसंना? ईरोदकांनी बी याचं भांडवाल करायची ही येळ न्हाय. आता मारलं गेलं ती भारतीय हायती न्हवं? आन् त्यांच्या नातेवाईकांनीच आरोप केला आसंल तर कशापाई त्यो वाद?

**बाबूराव :** ईरोदक बोललं की भाजपला झोंबतं.

**पांडूनाना :** आरं ह्यात ते शंकराचार्य म्हनालं सिंदुचं पानी रोकायला ईस वरसं लागत्याल त्यावं ही गप्प का?

**बाबूराव :** साधू-संतांवर बोलायचं तर आंगलट कुनी घ्यायचं? म्हनून भाजपवालं गप्प. **- अमृत चौगुले**

# उपदेश कथा

### सुख

काही प्राणीकथा आपल्याला खूप मोठा बोध करून जातात. फक्त तो समजण्याची दृष्टी हवी, नजर हवी. रावसाहेब असेच गच्चीत बसलेले असतानाची गोष्ट. त्यांच्या समोरील भिंतीवर एक मधाचे भांडे ठेवलेले होते. कुठून कोण जाणे पण त्या मधाच्या वासाने तिथे गांधीलमाशा येऊ लागल्या. भांड्याच्या काठावर बसून त्या मधाचा आस्वाद घेऊ लागल्या. रावसाहेबांनी प्रथम त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं पण त्या जसजशा वाढू लागल्या तसतशी त्यांची दखल घेणे त्यांना आवश्यक वाटले म्हणून ते भांड्याजवळ गेले. त्या माशांना उडवून लावू लागले पण त्या उडेनात. त्यांनी बारकाईनं पाहिलं तेव्हा त्यांना दिसलं की, त्या माशांचे पंख मधाच्या भाड्याला चिकटून बसले आहेत. मध खाताना हा धोका माशांच्या लक्षातच आला नव्हता. मध खाण्याच्या सुखात त्या गुरफटून गेल्या होत्या आणि आपले पंख गमावून बसल्या.

कथा उपदेश : भौतिक सुखात असा एकदा का माणूस गुरफटला की, त्याचेही पंख कापले जातात. मानसिक शांतीला पारखा होतो. एका अर्थाने सुखोपभोगाने तो अपंग होतो.

# दिनविशेष...

२००६ - सौदी अरबच्या राहेली येथे एक बस खड्ड्यात कोसळल्याने २८ जण ठार झाले. २००७ - ऑस्ट्रेलियाने सलग तिसऱ्यांदा व एकुण चौथ्यांदा विश्वचषक जिंकण्याचा पराक्रम केला. त्याने श्रीलंकेला नमविले. २००७ - ऑस्ट्रेलियाने विश्वचषकात सलग तिसरे विजेतेपद मिळविल्यानंतर क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याची घोषणा केलेला गोलंदाज ग्लेन मॅक्ग्रा याची 'प्लेयर ऑफ द टूर्नामेंट' म्हणून निवड करण्यात आली. २००७ - अनिवासी भारतीय उद्योगपती लक्ष्मी निवास मित्तल यांनी लागोपाठ तिसऱ्या वर्षी ब्रिटनमधील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत पहिले स्थान पटकावले. २००७ - अमेरिकी लष्कराने इराकमधील दोन प्रांतात छापा टाकून अलकायदाशी संबंधीत काम करणाऱ्या ७२ संशयित अतिरेक्यांना अटक केली. २००७ - राष्ट्रीय राजधानी दिल्लीमध्ये आयोजित एका समारंभात पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनिय योगदान दिल्याबद्दल २३ पत्रकारांना मातृश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# जन की बात...

## युपीएससीत मराठी मुलांचे यश!

नुकताच युपीएससीचा अंतिम निकाल जाहीर केला. या परीक्षेत महाराष्ट्रातील ९० हून अधिक विद्यार्थी यशस्वी झाले. पहिल्या शंभर यशस्वी विद्यार्थ्यांत ७ मराठी उमेदवार आहेत. महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. पूर्वी या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांत मराठी विद्यार्थ्यांची संख्या नगण्य होती पण मागील काही वर्षांपासून या परीक्षेतही मराठी मुलांनी बाजी मारून मराठी मुलेही कशात कमी नाहीत हे दाखवून दिले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाची ही परीक्षा अतिशय कठीण असते. नागरी सेवेमधील ही सर्वोच्च परीक्षा असून या परीक्षेत यशस्वी झालेले विद्यार्थी पुढे जाऊन प्रशासकीय अधिकारी होतात. ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थी खूप मेहनत घेतात रात्रीचा दिवस करतात. १२ ते १८ तास अभ्यास करतात. जिद्द आणि इच्छाशक्तीला मेहनतीची जोड मिळाली तर या जगात काहीही अशक्य नाही हेच या मुलांनी दाखवून दिले आहे. महाराष्ट्रातील या मुलांचे यश पाहून भविष्यात महाराष्ट्रातून आणखी सनदी अधिकारी निर्माण होतील यात शंका नाही. या परीक्षेत यशस्वी झालेले बहुतेक विद्यार्थी मराठी माध्यमातून शिकलेले आहेत हे विशेष. लाखो रुपये डोनेशन भरून इंग्रजी माध्यमात आपल्या मुलांना दाखल करणाऱ्या आणि इंग्रजी माध्यमातून शिकले तरच करियर होते असा समज असणाऱ्यांसाठी तर ही मोठी चपराक आहे. सनदी सेवेमध्ये मराठी मुलांचे हे यश पाहून 'मराठी पाऊल पडते पुढे!' असेच म्हणावे लागेल.

**-रेणुका ठाणेदार, पुणे**

## फास्टफूड देतेय आजाराला निमंत्रण



अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खाताना दिसत आहेत. विशेषतः शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात. हे पदार्थ कोणत्या तेलात तळले जातात याची माहिती खाणाऱ्याला नसते. अति प्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ वरचेवर देत असतात. तरी कित्येक लोक त्यांचे ऐकत नाहीत म्हरूनच मोठ्याबरोबर आता फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफूड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. आतातरी पालकांनी मुलांना फास्टफुडपासून दूर ठेवायला हवे. फास्टफुडऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

संशोधकांच्या संशोधनानुसार फास्टफुडमुळेच मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण तर वाढतेच आहेच शिवाय मुलांमध्ये इतर आजारांचे प्रमाणही वाढू लागले आहे. आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. सध्याच्या धावपळीच्या काळात नोकरी करणाऱ्या स्त्री वर्गाला तर जेवण तयार करण्यासाठी वेळ मिळत नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. मात्र त्यातून अनेक आजारांना निमंत्रण मिळते हेच खरे.

**अंजली कदम, माधवनगर**

## वाढते अपघात चिंताजनक

आपल्याकडे दररोज स्त्यासर अपघात होताना पहायला मिळतात. दिवसेंदिवस हे प्रमाण वाढतानाच दिसत आहे. दररोजच्या वर्तमानपत्रात, टी. व्ही वरील बातम्यात आपण मोठ्या शहरातील अपघातांबरोबर छोट्या गावातही अपघात झाल्याचे एकण्यात, वाचतनात येते. याचे मुख्य कारण म्हणजे वेगात वाहन चालविल्यामुळे होणारे अपघात. त्याचबरोबर वाहतूक नियमांचे भंग केल्यामुळे झालेले अपघात आहेत अतिवेग माणसाला वेळेच्या आधी मरणाच्या दारात घेवून जातो. घाटातील उतारावर गाडी चालक वाहन बंद करून नेतात. अनेकदा मोठमोठ्या डोंगरावर कित्येक देवस्थानांचे दर्शन घेण्यासाठी जाणाऱ्यांची संख्या मोठी दिसते. अशा वेळी ओव्हरटेक करण्याच्या नादात मोठ्या प्रमाणावर अपघात होताना दिसतात. हे त्यातील एक महत्वाचे कारण आहे.

अलीकडे मोबाईलवर बोलत वाहन चालविणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. एकूणच हे अपघात कमी करण्यासाठी वाहन चालकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढतच आहे. अशा वेळी नियमांचे पालन करणे ही आवश्यक बाब आहे. वेगावर नियंत्रण ही सुध्दा आवश्यक बाब आहे. सरकारने सुध्दा यावर कडक कायदे केले पाहिजेत व मोठ्या प्रमाणात दंडाची आकारणी केली तरच दिवसेंदिवस घडणाऱ्या या अपघाताला आळा बसेल.

**-माया माने, कर्नाळ**

## साकुरी येथे स्वतंत्र तलाठी द्या माहिती अधिकार महासंघ यांची मागणी

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहाता : तालुक्यात सर्वात मोठे गाव म्हणून ओळख असलेल्या साकुरी गावातील तलाठी व मंडळ अधिकारी यांची इमारत हि स्वतंत्र तलाठी नसल्यामुळे शोभेची वस्तू बनली आहे मागील तीन ते चार वर्षापासून साकुरी येथे स्वतंत्र तलाठी नाही त्यामुळे नागरिकांची मोठी ससे होल पट होत आहे साकुरी सह राहता व पिंपळस या तीन गावाचा कारभार राहता येथील तलाठी यांचे मार्फत चालतो.

साकुरी गावातील वृद्ध महिला वृद्ध पुरुष यांना शासनाचे वेगवेगळे दाखले घेणे कामी पायपीट करत राहता येथे जावे लागते एवढे करून सुद्धा राहता येथील तलाठी कार्यालय मध्ये तलाठी हे कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध नसतात त्यांना सतत तहसील मध्ये मिटींगा असल्याचे सांगितले जाते याबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

या अगोदर साकुरी गावासाठी स्वतंत्र्य तलाठी नेमावा म्हणून अनेक वेळा तहसीलदार ,प्रांताधिकारी यांना अर्ज दिलेले आहे मात्र त्यावर कुठलीही कार्यवाही झालेली नाही साकुरी येथे स्वतंत्र तलाठी नेमणूक करण्यासाठी नेमकी अडचण कुणाची आहे याचे उत्तर अजून गावातील नागरिकांना मिळालेले नाही तरी याबाबत आता पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी लक्ष घालावे अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# शुद्ध पाणी आरो प्लांट आणि कचरा व्यवस्थापन घोटाळा ?

## अनिल सानप यांचे मोठे आका या भ्रष्ट कारभाराची चौकशी करणार ?

■ जनप्रवास प्रतिनिधी

पाथर्डी : पाथर्डी तालुक्यातील जवळपास १०८ ग्रामपंचायत मध्ये जिल्हा परिषद आणि पंधरावे वित्त आयोगानुसार बिलो पाच लाखाच्या आत काम करण्याचा अधिकार ग्रामपंचायतला दिला असल्याने ग्रामपंचायत अंतर्गत गावात शुद्ध पाणी पिण्यासाठी आरो प्लांट बसवणे तसेच गावांतर्गत कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी कचराकुंडी हौद बांधणे या कामात लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते किसन आव्हाड यांनी केला आहे याबाबत सविस्तर माहिती अशी की ग्रामपंचायत १५ वा



वित्त आयोगानुसार शुद्ध पाणी पिण्यासाठी आरो प्लांट बसवणे आणि कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी कचराकुंडी हौद बांधणे या कामात काही ठराविक ग्रामपंचायत वगळता बहुतांश ग्रामपंचायत मध्ये ग्रामीण पाणीपुरवठा उपअभियंता अनिल सानप आणि काही ग्रामसेवक यांनी मिळून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे कारण ग्रामीण पाणीपुरवठा उपअभियंता अनिल सानप यांनीच आरो प्लांट आणि कचरा व्यवस्थापन या कामात सार्वजनिक बांधकाम आणि ग्रामीण पाणीपुरवठा उपअभियंता एमबी लिहून बिलांवर स्वाक्षरी केली आहे मुळात सदरील कामाचे इस्टिमेट न करता त्या कामावर देखरेख कॉलिटी कंट्रोल शाखा अभियंता यांनी करून अहवाल आणि एमबी लिहिण्याचे काम करायचे असते आणि मग बिलासाठी स्वाक्षरीला उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा आणि सार्वजनिक बांधकाम व गटविकास अधिकारी यांच्याकडे द्यायचे असते परंतु काही ग्रामपंचायतच्या आरो प्लांट आणि कचरा व्यवस्थापन एमबी आणि बिलावर शाखाअभियंता रवींद्र बेळगे यांच्या तर बहुतांश ग्रामपंचायतच्या बोगस कामात केवळ सार्वजनिक बांधकाम आणि ग्रामीण पाणीपुरवठा उपअभियंता अनिल सानप यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत मुळात हे ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ५३(१) या विरोधात आहे यामुळे अनिल सानप यांनी ग्रामपंचायत अधिनियम कलम ५३(१)चा भंग केल्याप्रकरणी ४२० फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्यांची खातेनिहाय चौकशी करून त्यांचे कायमस्वरूपी निलंबन करण्यात यावी असे मागणी किसन आव्हाड यांनी केली आहे.


> खरवंडी कासार ही तालुक्यातील महसूलची मोठी ग्रामपंचायत आहे या ग्रामपंचायत मध्ये आरो प्लांट बसवणे आणि कचरा व्यवस्थापन करणे या कामात भ्रष्टाचार झाला आहे जवळपास १९ लक्ष रुपये खर्चाच्या घनकचरा व्यवस्थापन कचराकुंडी हौद बांधणे या कामात एकही कचराकुंडी हौद खरवंडी कासार उपनगरात बांधण्यात आले नाही आणि परस्पर बिले देण्यात आले असा आरोप करत शैलेंद्र जायभाय यांनी करत चौकशी करण्याची मागणी केली आहे.

## “सेवेच्या साधनेतून नेतृत्वाकडे : राजेंद्र कुलथे यांचा सन्मान”

■ जनप्रवास प्रतिनिधी

निमोणे : शिरूर नगरीतील सामाजिक सेवेचा तेजस्वी दीप पुन्हा एकदा उजळला आहे. सुवर्ण भरारी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या पुणे जिल्हाध्यक्ष पदावरून पदोन्नती होऊन राजेंद्र कुलथे यांची प्रदेश सरचिटणीसपदी गौरवपूर्ण निवड झाली आहे.

श्री १००८ मंडलेश्वर श्री संत दत्तात्रय दहिवाल महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व सारिकाताई नागरे यांच्या आदेशाने व संस्थेचे प्रदेशाध्यक्ष संदीप भाऊ मानकर, संपर्क प्रमुख संजय तळेकर आणि प्रदेश कार्याध्यक्ष संतोष दादा सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली ही पदोन्नती पार पडली.



राजेंद्र कुलथे हे केवळ सुवर्ण भरारी संस्थेचे सक्रीय कार्यकर्ते नाहीत, तर ह्युमन राइट्स फाउंडेशन ऑफ इंडिया या राज्यस्तरीय संस्थेच्या माध्यमातूनही मानवतेच्या सेवेत सदैव कार्यरत आहेत. समाजातील दुर्बल घटकांपर्यंत न्याय पोहोचवण्याची त्यांनी अखंड चळवळ ०उभारली आहे. त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे असंख्य सामाजिक उपक्रम फुलवले गेले आहेत.

या नव्या जबाबदारीतून त्यांच्यावर संस्थेचे कार्य अधिक जोमाने फुलवण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यांच्या अनुभवाचा व सामाजिक बांधिलकीचा लाभ समाजाच्या उन्नतीसाठी होईल, असा दृढ विश्वास संस्थेच्या सर्व सदस्यांनी व्यक्त केला. राजेंद्र कुलथे यांनी आपल्या कर्तृत्वाने जे दीप प्रज्वलित केले आहे, ते भविष्यात अनेकांना प्रेरणा देणारे ठरेल. त्यांच्या या निवडीबद्दल संपूर्ण कुटुंबीय व सर्व सहकाऱ्यांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मंगल कलश रथयात्रा उद्या कोपरगाव-शिर्डीत

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

कोपरगाव : राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने राज्यात महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रेचे आयोजन करण्यात आले असून ही मंगल कलश रथ यात्रा बुधवार (दि.३० एप्रिल) रोजी कोपरगाव तालुक्यातून शिर्डीत दाखल होणार आहे. या मंगल कलश रथयात्रेचे शिर्डी येथील शासकीय विश्रामगृह येथे सकाळी १०.०० वा.आ.आशुतोष काळे स्वागत करणार असल्याची माहिती कोपरगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष चारुदत्त सिनगर यांनी दिली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाचे मुंबई येथे आयोजन करण्यात आले आहे. आपल्या महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचा, सामाजिक समरसतेचा आणि एकात्मतेचा संदेश देणारी हि मंगल कलश रथ यात्रा राज्यभर उत्साहात सुरु आहे. या मंगल कलशमध्ये गडकिल्ले, ऐतिहासिक वास्तूंची माती, नद्यांचे पाणी एकत्रित करण्यात येणार असून कोपरगाव मतदार संघातून वाहणाऱ्या गोदावरी नदीचे पवित्र जल व विविध धार्मिक तीर्थक्षेत्राच्या पावन भूमीतील माती सजविलेल्या मंगल कलशातून मुंबई येथे नेण्यात येणार आहे. धार्मिक उत्सवाबरोबरच भक्तीच्या संगमातून संस्कृतीचा सन्मान करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने या मंगल कलश रथ यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या मंगल कलश रथयात्रेच्या स्वागतास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन चारुदत्त सिनगर यांनी केले आहे.

## घुमनदेव येथे महिलेला एकटी पाहून विनयभंगाचा प्रयत्न

■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळीभान : घरी एकटी महिला असल्याची संधी शोधून तिच्या घरी जावून तिला मिठी मारून लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन आरोपीने केल्याची घटना श्रीरामपूर तालुक्यातील घुमनदेव येथे २५ एप्रिल रोजी सायं.७.३० वाजेच्या दरम्यान घडली.

याबाबत पीडीत महिलेकडून श्रीरामपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून भैरव भाऊसाहेब कांगूणे याचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, श्रीरामपूर तालुक्यातील घुमनदेव येथे पीडीत महिला ही तिची आई व मुलीसोबत राहते. संबधित महिलेचा पती हा १२ वर्षापूर्वी मयत झालेला आहे. या महिलेच्या घराशेजारीच भैरव कांगूणे हा कुटूंबासह वास्तव्यास आहे. शुक्रवार दि.२५ एप्रिल रोजी पीडीत महिलेची आई व मुलगी सायं.५.३० वाजेच्या दरम्यान भोकर येथे दवाखान्यात गेल्या होत्या. तेंव्हा सदर महिला घरी एकटीच असल्याची संधी शोधून भैरव कांगूणे हा सायं.७.३० वाजेच्या दरम्यान पीडीत महिलेच्या घरी गेला व संबधीत महिलेला आवाज देवून बाहेर बोलावले व घरचे कुठं गेले म्हणून विचारपूस केली. घरचे हे दवाखान्यात भोकर येथे गेले असल्याचे या महिलेने सांगताच तु मला खूप आवडते. असे म्हणून संबधित महिलेचा हात धरून भैरव कांगूणे याने तीला मीठी मारून लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. या प्रकारानंतर घाबरलेल्या महिलेने आरडाओरड केली असता कुणाला काही सांगीतल्यास तुला जीवंत ठेवणार नाही अशी धमकी देवून शिवीगाळ करत कांगूणे हा निघून गेला. त्यानंतर मुलगी व आई घरी आल्यानंतर सर्व प्रकार त्यांना सांगीतला. व मुलीला घेवून पोलीस ठाणे गाठले असल्याचे महिलेने फिर्यादीत नमूद केले आहे. संबधित महिलेच्या ०फिर्यादीवरून भैरव कांगूणे याचेवर भा.न्या.सं. २०२३ कलम ७४, ३५२, ३५१(२), ३५१(३) नूसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास ॲडीशनल एस पी रॉबीन बनसल यांच्या मार्गदर्शनाला पो.नि.दशरथ चौधरी व इतर करत आहे.

## जातेगाव बुद्रुकला स्वतंत्र विद्युत रोहित्र द्या

### ग्रामस्थांची विद्युत वितरण विभागाला निवेदन देत मागणी

■ जनप्रवास प्रतिनिधी

शिक्रापूर : जातेगाव बुद्रुक ता. शिरुर येथे काही ठिकाणी विद्युत रोहीत्रांवर ताण येत असल्याने गावातील काही वस्त्यांना स्वतंत्र विद्युत रोहित्र द्या अशी मागणी ग्रामस्थांनी विद्युत वितरण विभागाला निवेदन देत केली आहे. जातेगाव बुद्रुक ता. शिरुर येथील महानुभाव मंदिर, सूर्यवाडी व इंगवले वस्ती येथे कमी दाबाचे विद्युत रोहित्र असून सध्या तेथील विद्युत रोहीत्रांवर ताण येत असल्याने नवीन उच्च दाबाचे विद्युत रोहित्र बसवण्याची मागणी सरपंच निलेश उमाप, माजी ग्रामपंचायत सदस्य प्रवीण पटेकर, शरद उमाप यांनी विद्युत वितरण विभागाचे उपकार्यकारी अभियंता नितीन



महाजन यांना निवेदन देत केली असून याबाबत बोलताना विद्युत रोहीत्रांवर ताण येत असल्याने आम्ही विद्युत वितरण विभागाला नवीन रोहीत्रांची मागणी केली असल्याचे सरपंच निलेश उमाप यांनी सांगितले. तर याबाबत बोलताना जातेगाव बुद्रुक येथील सदर ठिकाणची पाहणी करुन त्याबाबतचे अहवाल व अंदाजपत्रक वरिष्ठ कार्यालयाला पाठवणार असल्याचे विद्युत वितरण विभागाचे उपकार्यकारी अभियंता नितीन महाजन यांनी सांगितले.

## कृषी व सामाजिक कार्याची दखल घेऊन लवांडे यांना ‘पद्मश्री डॉ मनीभाई राष्ट्रसेवा पुरस्कार’ २०२५ वितरित!

■ जनप्रवास प्रतिनिधी

शेवगाव : राष्ट्रहितासाठी समर्पित भावनेने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सेवावृत्तींचा गौरव करण्यासाठी पद्मश्री डॉ मनीभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार रविवार दि २७ रोजी पुणे येथील आंबेडकर भवन येथे वितरित करण्यात आले.

पद्मश्री डॉ मनीभाई देसाई प्रतिष्ठान एन . वाय. के. क्रीडा व युवक कल्याण मंत्रालय, निती आयोग भारत सरकार, तसेच एम एस एम इ उद्योग मंत्रालय भारत सरकार संलग्नित संस्थेच्या वतीने हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक आणि प्रवचनकार डॉ रवींद्र भोळे यांच्या हस्ते हे पुरस्कार



वितरित आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष रवींद्र भोळे यांनी सांगितले की, राष्ट्रभक्तीची ज्योत तेवत ठेवण्यासाठी , राष्ट्रीय एकात्मतेचे जतन करण्यासाठी आणि सामाजिक कार्याचे कार्याचे मूल्यमापन व प्रेरणा देण्यासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

२७ एप्रिल रोजी रविवारी संध्याकाळी पुणे येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन पुणे स्टेशन या ठिकाणी भव्य समारंभात कृषी व सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल रावसाहेब लवांडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या समारंभाला पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, आमदार राहुल दादा कुल, आमदार अमोल जावळे, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले. यावेळी शेवगाव तालुक्यातील अनेक शेतकरी या समारंभासाठी उपस्थित होते, यावेळी एकनाथ घनवट , स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब फटांगडे, मेजर अशोक भोसले, अमोल देवढे, अजित लवांडे, दादा ज्योतीक, रामनाथ घुगे, महेश थोरात, अनिल चेडे, अशोक गिरजे कितीबी मनोरिया प्रसंगी उपस्थित होते.

## ज्ञानसंपदा शाळेत विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : विध्यार्थीदशेत खेळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. माणसाचे मन, बुद्धी,शरीर तंदुरुस्त राहून आपले आरोग्य निरोगी राहते. याची आवड व छंद बालवयात म्हणजे विद्यार्थीदशेत निर्माण करणे या उद्देशाने ज्ञानसंपदा शाळेने याची जोपासना व्हावी म्हणून विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन केले आहे. यामध्ये शंभर मुलांचा उस्फूर्त सहभाग आहे. या शिबिरामध्ये खो-खो, सेपक टकरा,फुटबॉल, बॅडमिंटन, योगा, टेबल टेनिस, ॲथलेटिक्स , इ. खेळांचा समावेश आहे. यामध्ये एकात्मता अंगी बाणण्यासाठी सांघिक खेळाला तसेच वैयक्तिक खेळाला प्राधान्य दिले गेले. मोबाईल मधून मुलांना बाहेर काढून त्यांची मैदानी खेळाशी, मातीतील खेळाशी नाळ जोडली जावी, यासाठी शाळेचा हा स्तुत्य उपक्रम विध्यार्थ्यांसाठी त्यांच्यातील खेळातील प्रविण्य सिद्ध करण्यासाठी उपयोगी ठरत आहे.यावर्षी विध्यार्थ्यांचा उस्फुर्त सहभाग मिळत आहे.



## एमआयडीसीमधील अवैध दारू विक्रेत्यांवर छापे



■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : पोनि/श्री दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखाव तपास पथकातील पोलीस अंमलदार शाहीद शेख, गणेश धोत्रे, अरूण गांगुर्डे, हृदय घोडके, विजय ठोंबरे, आकाश काळे, भाग्यश्री भिटे व महादेव भांड अशांचे पथक तयार करून एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंदयाची माहिती काढुन कारवाई करणेबाबत सुचना देऊन पथक रवाना केले.

दिनांक २५/०४/२०२५ व दिनांक २६/०४/२०२५ रोजी पथकाने एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंदयाची माहिती काढुन अवैध दारूच्या ११ ठिकाणी छापे टाकुन कारवाई केली.एमआयडीसी भागातील अकरा ठिकाणी छापे टाकुन मुद्देमाल सह आरोपींना अटक केली. कारवाईमध्ये एमआयडीसी पोलीस स्टेशनला खालीलप्रमाणे महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये ११ गुन्हे दाखल करण्यात येऊन ३०,२८५/- रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

## आपल्या वाट्याला आलेले दु:ख इतरांच्या वाट्याला येऊ नये : राजेंद्र बलदोटा

### श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत कॅन्सर तपासणी

■ जनप्रवास प्रतिनिधी

नगर : आपल्या कुटुंबाच्या वाट्याला आलेले दु:ख व आजार इतरांच्या वाट्याला येऊ नये, या सामाजिक संवेदनेने सर्वसामान्यांसाठी मोफत कॅन्सर तपासणी शिबिर घेण्यात आले. वेळीच कॅन्सरचे निदान व उपचार झाल्यास त्या रुग्णाला पुन्हा नवजीवन मिळते. दीन-दुबळ्या रुग्णांना आनंदऋषीजी हॉस्पिटल नवजीवन देण्याचे काम करत आहे. या रुग्णसेवेच्या आरोग्य मंदिरात नेहमीच सहकार्य राहणार असल्याचे प्रतिपादन राजेंद्र बलदोटा यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये



स्व. ललीता राजेंद्र बलदोटा यांच्या स्मरणार्थ बलदोटा परिवाराच्या वतीने आयोजित मोफत कॅन्सर तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी राजेंद्र बलदोटा बोलत होते. यावेळी दिलीप संचेती, सुमतीलाल बलदोटा, अभय संचेती, आकाश संचेती, सचिन भंडारी, हेमलता संचेती, कल्पना संचेती, प्राजक्ता बलदोटा, प्रिशा बलदोटा, मनिषा शिंगवी, महावीर शिंगवी, मयूर शिंगवी, सचिन कटारिया, स्नेहा शिंगवी, अविनाश साळुंके, संजय लोढा, स्वप्निल गांधी, अजित कर्नावट, राजेंद्र ताथेड, मनिषा लोढा, अक्षय भंडारी, शरद डोंगरे, सुजय गांधी, श्रेयस कोठारी, राजू छल्लाणी, संतोष बोथरा, सतीश लोढा, माणकचंद कटारिया, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, कॅन्सर सर्जन डॉ. अनिकेत शिंदे आदी उपस्थित होते.

## संक्षीप्त वृत्त

## शासकीय सेवेत रूजू झालेल्यांचा ''व्हिज्युअल'' च्या वतीने सन्मान



■ जनप्रवास : प्रतिनिधी

टाकळीभान : शासकीय सेवेत रूजू झालेल्या तरूणांचा व्हिज्युअल अभ्यासीकेच्या वतीने नूकताच सन्मान करण्यात आला.

धर्मादाय आयुक्त कार्यालय क्लर्क पदी विलास इथापे, संभाजीनगर पोलीस सोपान बनकर, आर्मी अग्नीवीर मध्ये योगेश पटारे, विशाल रणनवरे यांची निवड झाली. वरील सर्वांचा यावेळी व्हिज्युअल अभ्यासिकेच्या वतीने सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी प्रा.कार्लस साठे, संत सावताचे अध्यक्ष बाबासाहेब तनपुरे, अनिल पटारे, श्रीधर गाडे, बाबासाहेब लोखंडे, शंकरराव शिंदे, पो.कॉ.गणेश इथापे, दिलीप लोखंडे, किशोर शिंदे, सुनिल दाभाडे आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्हिज्युअल अभ्यासिके बद्दल समाधान व्यक्त करत या अभ्यासिकेतून आतापर्यंत अनेक विद्यार्थी शासकीय सेवेत रूजू झाले असल्याचे सांगत ही बाब कौतूकाची असल्याचे सांगून महेश शिंदे यांना धन्यवाद दिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अर्जून राऊत यांनी तर आभार महेश शिंदे यांनी मानले.

## गं.भा.धनुबाई पटारे यांचे निधन



■ जनप्रवास : प्रतिनिधी

टाकळीभान : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील जुन्या पिढीतील गं.भा.धनुबाई(जीजी) बाळाजी पाटील पटारे यांचे नूकतेच वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय(१०२)वर्ष होते. त्यांच्या निधनाने टाकळीभानसह पंचक्रोशीमध्ये शोककळा पसरली आहे. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बापूसाहेब पटारे, रोहीदास, दिलीपराव, शिवाजी व संभाजी पटारे यांच्या त्या मातोश्री तर अशोकचे माजी संचालक लक्ष्मण(भाऊ)पाटील थोरात व माजी सरपंच मंजाबापू थोरात यांच्या त्या आत्या होत.

## मंथन परीक्षेत ज्ञानदीप प्राथमिक शाळेचे घवघवीत यश




■ जनप्रवास : प्रतिनिधी

शेवगाव : शेवगाव, राज्यस्तरीय मंथन परीक्षेत येथील ज्ञानदीप प्राथमिक शाळेने घवघवीत यश संपादन केले. या शाळेच्या चार विद्यार्थ्यांनी जिल्हा स्तर व तालुकास्तरावर बाजी मारली.

ज्ञानदीप प्राथमिक शाळेचे यशस्वी विद्यार्थी व गुण पुढीलप्रमाणे – सान्वी केशव कंक ( १५० पैकी १३६ , राज्यात आठवी तसेच जिल्ह्यात तिसरी ), सेजल तुषार खंडागळे ( १२० , तालुक्यात प्रथम ), ज्ञानेश्वरी केतन अकोलकर ( १०८ , तालुक्यात तिसरी ), समर्थ गोरख घोडसे ( ३०० पैकी २२६ , तालुक्यात पाचवा ) या यशस्वी विद्यार्थ्यांना अलोलिका बर्डे – लांडे , लता गारूडकर यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे मार्गदर्शक संजय फडके, संस्थेच्या अध्यक्षा सविता फडके, मुख्याध्यापक भानुदास सातपुते यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## गोवंशीय जनावरांची कत्तल करुन मांसविक्री; करणाऱ्यांविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीसांची कारवाई

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरिक्षक जगदीश मुलगीर यांना गोपणीय माहिती मिळाली की, अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर भागात दर्गा दायरा येथे नादीर अब्दुल अजीज कुरेशी व दरबार चौक येथे साजीद अकबर चौधरी असे महाराष्ट्र शासनाने बंदी केलेल्या अशा गोवंशीय मासांची विक्री करीत आहेत, अशी माहिती मिळाल्याने सहा. पोलीस निरिक्षक श्री. जगदीश मुलगीर यांनी तात्काळ गुन्हे शोध पथकातील अंमलदार व पंचासह बातमीतील नमुद ठिकाणी जाऊन कारवाई करणे बाबत आदेशीत केले असता मुकुंदनगर परिसरातील दरबार चौक येथे सकाळी ०९.०० वा व दर्गा दयरा येथे सकाळी ०९.४५ वा पंचा समक्ष छापा टाकुन कारवाई केली सदर कारवाई दरबार चौक येथील कारवाईत २२५००/– रु किमतीचे ७५ किलो गोमांस व १७००/–रु किमतीचे साहीत्य तसेच दर्गादयरा येथील कारवाईत २७०००/– रु किमतीचे ९० किलो गोमांस व ७३००/– रु किमतीचे साहीत्य असे एकुन ५८३००/– रु किमतीचा मुद्देमाल जप्त करुन ताब्यात घेतला.

# संत गोरोबा काका कुंभार आणि स्वामी समर्थ पुण्यतिथी सोहळा सरस्वतीनगर येथे उत्साहात साजरा



■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

इंदापूर : या सोहळ्याचे संयोजक ह. भ. प. भारत कुंभार कुटुंबीय आणि समाजबांधव यांचे वतीने सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते . सोहळ्याच्या निमित्ताने ह.भ.प.चैतन्य महाराज बारवकर यांच्या सुश्राव्य कीर्तन झाले . पवित्र ते कुळ पावन तो देश श्र जेथे हरीचे दास जन्म घेती श्रश्र या संत उक्तीनुसार आपण खरोखरच भाग्यवान आहोत कारण संतभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र भूमिमध्ये आपला जन्म झाला. ज्या भागवत धर्माचे आपण पाईक आहोत त्या भागवत धर्म रुपी इमारतीचा पाया ज्ञानेश्वर माऊलींनी रचला आणि जगतगुरू तुकोबारायांनी कळस उभारला. इतर संत मंडळी त्या इमारतीचे खांब झाले. पण या सर्व संत मंडळींना तत्कालीन समाजाचा त्रास सोसावा लागला, प्रसंगी त्यांच्या सहज कृतीतून चमत्कारही घडले तेंव्हा त्यांना संत मानलं गेलं. अर्थात चमत्कार दाखवणं हा त्यांचा हेतू नव्हताच. मलीन झालेली भक्तीची वाट साफ करून ती सामान्य लोकांना दहखवून देणं हे त्यांचं जीवित कार्य होतं. ज्यांची आज आपण पुण्यतिथी साजरी करीत आहोत त्या संत गोरोबा काकांचा जन्म सध्याच्या धाराशीव जिल्ह्यातील तेरणा नदीच्या काठावर वसलेलं तेरगाव या ठिकाणी झाला. गोरोबा काकांनाही समाज कंटकांनी भरपूर त्रास दिला. काकांनी स्वत: घडवलेल्या विटा लोकांनी तेरणा नदीमध्ये फेकून दिल्या. पण विटा पाण्यात न बुडता पाण्यावर तरंगू लागल्या. मग लोकांनी त्या विटा आणल्या आणि त्यांची पूजा करू लागले. भारत काका, त्यांचे कुटुंबीय आणि समाज बांधव यांच्या संयोजनातून आणि सर्वांच्या सहकार्याने सकारणारा हा सुवर्णमाहोत्सवी सोहळा.हे औचित्य साधून

आज या ठिकाणी एक छोटेखानी परंतु विशेष कार्यक्रम संपन्न होत आहे. गोरोबा काकांचं तेरगाव हेच माहेर असणाऱ्या सौं. दमयंती घाडगे मॅडम या सोहळ्यात उपस्थित होत्या . पुर्वी हा सोहळा गावात कुंभार वाडयात होत असल्या पासून आज तागायत या कार्यक्रमाला त्यांची उपस्थिती असते .

संत गोरोबा कांकांचे जन्मस्थळ तेरगांव हे त्यांचे माहेर असल्यामुळे त्यांची गोरोबाकाकां वर अपार श्रध्दा आहे . माहेरची आठवण म्हणून संत गोरोबा काकांनी स्व:ता घडवलेली आणि पाण्यावर तरंगणारी वीट त्यांनी सोबत आणलेली होती . आजपर्यंत या वीटेची भक्ती भावाने देवघरात पुजा करित होत्या . आज तीच वीट सुवर्ण महोत्सवी ५० वर्षाच्या पुण्यतीथी निमित् ही वीट त्यांचे हस्ते भारत कुंभार यांच्या कुटुंबाकडे भक्ती भावाने हरिनामाच्या गजरात हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत मंदिरास समर्पित केली . माहेरचा हा अनमोल ठेवा ेयावेळी दमनंती घाडगे मॅडम यांचा कुंभार कुंटुंबाकडून सत्कार करणेत आला .

या प्रसंगी मा . उपनगराध्यक्ष प्रा . कृष्णा ताटे सर , जेष्ठ नागरिक संघाचे गुजर सर , हभप हरिदास सामसे सर, कैलास कदम, महादेव चव्हाण, हमीद आत्तार, सुहास जोंजाळ, दिलीप वाघमारे व समाज बांधव तसेच महिला वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते .

## सुनील काकडे महावितरणच्या पुणे परिमंडल मुख्य अभियंतापदी रुजू

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : महावितरणच्या पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून श्री. सुनील काकडे यांनी शुक्रवारी (दि. २५) कार्यभार स्वीकारला. याआधीचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांची संचालक (मानव संसाधन) म्हणून थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. त्यांच्या रिक्त जागी भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. काकडे यांची पुणे येथे बदली झाली आहे.





मुख्य अभियंता श्री. सुनील काकडे मूळचे छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी आहे. विद्युत अभियांत्रिकीचे पदवीधर असलेले श्री. काकडे १९९७ मध्ये तत्कालिन म. रा. विद्युत मंडळामध्ये सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. सन २००६ मध्ये थेट भरती प्रक्रियेमधून त्यांची कार्यकारी अभियंता पदी निवड झाली. या पदावर त्यांनी चाळीसगाव, नाशिक, भुसावळ, छत्रपती संभाजीनगर येथे काम केले. तर २०१७ पासून पदोन्नतीने अधीक्षक अभियंता म्हणून त्यांनी कल्याण, अहिल्यानगर, भांडूप येथे काम केले. श्री. काकडे यांची डिसेंबर २०२२ मध्ये मुख्य अभियंता म्हणून पदोन्नती झाली व भांडूप परिमंडलात कार्यरत होते. आता पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून त्यांची बदली झाली आहे.

पुणे परिमंडलामध्ये 'इझ ऑफ लिव्हिंग'नुसार तत्पर ग्राहकसेवा तसेच सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठ्यासोबतच महावितरणच्या महसूलवाढीला सर्वाधिक प्राधान्य दिले जाईल, असे मुख्य अभियंता श्री. सुनील काकडे यांनी सांगितले.

## हिंगणगावच्या उपसरपंचपदी संदीप शिंदे यांची निवड

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : शेवगाव

हिंगणगावणे ग्रामपंचायत कार्यालय येथे लोकनियुक्त सरपंच सतीश पवार यांच्या अध्यक्षते खाली रोटेशन पद्धतीने उपसरपंच पदाची निवड करण्यात आली पार्टीचे ज्येष्ठ नेते व सर्व ग्रामपंचायत सदस्य यांच्या संमतीने श्री संदीप शिंदे यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली




यावेळी मावळते उपसरपंच श्री अमोल आहेर यांनी नव निर्वाचित उपसरपंच श्री संदीप शिंदे यांना कार्यभार दिला यावेळी शिवसंग्राम चे जिल्हाध्यक्ष नवनाथ ईसरवाडे ज्येष्ठ नेते साहेबराव पवार तालुकाध्यक्ष संदीप बामदळे ,डिगुनाना पवार, दत्तू भाऊ मस्के, किरण साठे ,बाबासाहेब गरड, कानिफनाथ धुमाळ, अण्णासाहेब बामदळे, मेजर गंगाधर पवार, महेश पवार ,गोपाल पवार, साहेबराव शिंदे, कृष्णा ढवळे , संजय पवार ,लक्ष्मण नाना पवार ,कल्याण पवार , पांडुरंग पारठे, दादा म्हस्के ,जनार्धन बामदळे ,लक्ष्मण आगळे व उपस्थित सर्व कार्यकर्त्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या निवडणूक अधिकारी म्हणून श्री खरड भाऊसाहेब यांनी काम पाहिले

## वडगांव रासई येथील नानगाव पुलावरील पडलेले खड्डे अखेर दुरुस्त : सामजिक कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांना यश

■ जनप्रवास प्रतिनिधी

नागरगाव : वडगाव रासाई नानगावला जोडणाऱ्या पूला वरील रस्ता गेले अनेक महिन्यापासून वाहतुकीसाठी मृत्यूचा सापळा बनलेला होता. अनेक वृत्तपत्रांमध्ये बातम्या झळकल्या होत्या सर्व पत्रकार बांधवांनी बातम्या लावूनही ते काम पूर्ण केले जात नव्हते,जास्त प्रमाणावर पुलावरील गज बाहेर येऊन अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती.



या सर्व गोष्टीची दखल घेऊन डॉ. सुजित शेलार तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दखल घेऊन शिरूर हवेलीचे विद्यमान आमदार माऊलीआबा कटके यांच्याकडे आणि बांधकाम विभागाकडे तक्रार करून पाठपुरावा केला.बांधकाम विभागाच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या मदतीने कामाची दखल घेऊन अत्याधुनिक प्रकारचे लिक्विड टाकून ते खड्डा बुजवण्यात आले. यामध्ये जाधव साहेब,पारखे साहेब,रावसाहेब डांगरे साहेब यांचे सर्व सरकारी अधिकारी तसेच शिरूर हवेलीचे विद्यमान आमदार माऊलीआबा कटके या सर्वांचे आभार नानगाव वडगाव रासाई ग्रामस्थांनी व्यक्त केले. काम पूर्णत्वास गेल्यानंतर पाहणी करून समाधान व्यक्त करताना डॉक्टर सुजित शेलार,वडगाव रासाई ग्रामपंचायतचे उपसरपंच आप्पासाहेब कोळपे,मा.सरपंच विलास तात्या शेलार, डॉक्टर बानखेले, विजय शेलार, नानगाव ग्रामस्थ मगर साहेब, आबासाहेब शेलार .

## कोलतावडे निरगुडसर येथे कळमजामाता देवीचा यात्रा उत्सव

■ जनप्रवास प्रतिनिधी

निरगुडसर : कोलतावडे निरगुडसर ता. आंबेगाव येथील कळमजामाता देवीचा यात्रा उत्सव बुधवार दिनांक ३० रोजी आयोजित करण्यात आला असून या उत्सवासाठी कोलतावडे निरगुडसर व पंचक्रोशीतील भाविक भक्त, ग्रामस्थांनी उपस्थित राहावे असे आवाहन समस्त ग्रामस्थ कोलतावडे निरगुडसर यांच्यावतीने करण्यात आले आहे.



बुधवार दिनांक ३० रोजी सकाळी सात वाजता देवीची महापूजा, आठ वाजता मांडव डहाळे, दुपारी बारा ते चार भजन, सायंकाळी पाच ते सात हारतुरे व शेरनी मिरवणूक, सायंकाळी सात ते आठ वाजता सत्कार समारंभ, रात्री आठ वाजता महाप्रसाद रात्री नऊ ते अकरा देवीची पालखी मिरवणूक व रात्री अकरा वाजता जगनकुमार वेळवंडकर सह हौसाराणी पुणेकर यांचा लोकनाट्य तमाशा संपन्न होणार आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी हजेरीचा कार्यक्रम होऊन कार्यक्रमाची सांगता होणार आहे. या नियोजित कार्यक्रमासाठी राज्याचे माजी सहकार मंत्री दिलीपरावजी वळसे पाटील यांच्यासह राजकीय, सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# प्रा. डॉ. भोर सर यांनी शिक्षण क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिले : हर्षवर्धन पाटील

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

इंदापूर : इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील कला शाखा प्रमुख व अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. भिमाजी काशिबा भोर यांच्या सेवापुर्ती कार्यक्रमाचे व अर्थशास्त्र विभागातील माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन शाहीर अमर शेख सभागृह येथे करण्यात आले होते. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री तसेच इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यावेळी बोलताना म्हणाले की, प्रा. डॉ. भोर सर यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते प्रा.डॉ.भोर आणि त्यांच्या पत्नी कल्पना भोर यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. हर्षवर्धन पाटील म्हणाले की,' नव्या पिढीने प्रा. डॉ. भोर सर यांचा आदर्श घ्यावा. भोर सर यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात केली. दृढ निश्चय करीत आपले शिक्षण पूर्ण केले तसेच शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी मोठे योगदान दिले आहे. समाज अर्थ साक्षर होणे काळाची गरज असून भोर सर यांनी पुढे या क्षेत्रात प्रबोधन करावे.




प्रा. डॉ.भिमाजी भोर सर म्हणाले की,' आर्थिक परिस्थिती हालाखीची असताना 'तूच आहे तुझ्या जीवनाचा शिल्पकार ' या वृत्तीतून संघर्ष करीत शिक्षण पूर्ण केले. मोठे भाऊ यांनी इंदापूर येथे अर्थशास्त्र विषयाचे अध्यापन करण्याची संधी दिली. आपणा सर्वांच्या सहकार्याने विद्यार्थी हित डोळ्यासमोर ठेवून मी शिक्षण क्षेत्रात कार्य केले आहे. यावेळी संस्थेचे सचिव ॲड. मनोहर चौधरी , सहसचिव प्रा. बाळासाहेब खटके , संचालक तुकाराम जाधव , गणपत भोंग , सुरेश मेहेर तसेच मेघ:शाम पाटील , धनंजय पाटील , प्रा. कृष्णाजी ताटे , विशाल बोंद्रे ,अंकुश पाडुळे , उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे,आंबेगाव तालुका पंचायत समितीचे माजी सभापती शिवाजीराव लोंढे ,पारगाव वि.का.सो.चे चेअरमन रमेश बोत्रे , सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.हरिभाऊ भोर ,डॉ. राजाराम तांबे, ग्रामसेवक अनंथा तांबे , वळती वि.का. सो.चे चेअरमन नारायण भोर , डीआरडीओ चे संशोधक निवृत्ती वाळुंज , निवृत्ती मुळे , रामदास मस्के , सौरभ वाळुंज , हरिदास मस्के , संतोष भोर , डॉ. अनिल खरमाळे , चंद्रकांत भोर , दत्तात्रय सुर्वे , सामाजिक कार्यकर्ते निमेष कोटकर उपस्थित होते. अर्थशास्त्र विभागाचे प्रा. शाम सातारले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. विज्ञान विभाग प्रमुख डॉ. शिवाजी वीर यांनी आभार मानले.

# प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्ण ताटकळत तर डॉक्टर गायब

## शिरुर तालुक्यातीील केंदूरच्या प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्था



■ जनप्रवास प्रतिनिधी

शिक्रापूर : केंदूर ता. शिरुर येथे सोमवारी आठवडे बाजार असताना त्या दिवशी वीस महिला कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी काही महिला आलेल्या असताना चाळीस हून अधिक बाह्यरुग्ण तपासणीसाठी आलेले असताना चक्क येथील डॉक्टर गायबच असल्याचे स्वत: सरपंच प्रमोद पऱ्हाड यांनी अनुभवले यावर आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करत तातडीने निवासी डॉक्टरची नेमणूक ज झाल्यास आंदोलांचा इशारा सरपंच प्रमोद पऱ्हाड यांनी दिला आहे.

### दोन डॉक्टरांना तात्काळ नोटीस

केंदूर येथील घडलेल्या प्रकाराबाबत तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश कट्टीमणी यांच्याशी संपर्क साधला असताना सदर प्रकार गंभीर असून मी तात्काळ डॉ. गजानन बावसकर व डॉ. रामदास चेपाटे दोघांना मी कारणे दाखवा नोटीस बजावून तसा अहवाल वरिष्ठ कार्यालयाला पाठवित आहे. कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी आपण खाजगी डॉक्टरांना निमंत्रित करतो ते दुपारी बारापर्यंत येतात. त्याप्रमाणे शिरुरचे डॉ. राहूल पाटील हे दुपारी बारापर्यंत येणार असल्याने रुग्णांना आपण बोलावून घेतो आणि शस्त्रक्रिया करतो. दरम्यान समुदाय आरोग्य अधिकारी हे प्रत्यक्षात डॉक्टर नसले तरी अगदीच कठीण प्रसंगी त्यांना आपण तपासणीचे अधिकार देतो तसा प्रकार इथे झाला असल्याचे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश कट्टीमणी यांनी सांगितले.

- डॉ. राजेश कट्टीमणी ( तालुका वैद्यकीय अधिकारी शिरुर )

### आम्हाला खाजगी रुग्णालयात जायला सांगितले

केंदूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात चारच दिवसांपूर्वी माझ्या मुलीला घेवून गेलो मात्र तेथे डॉक्टर नसलेला व्यक्ती तपासणी करीत होता, थोड्या वेळाने वैद्यकीय अधिकारी डॉ. रामदास चेपाटे आले त्यांनी मला तुम्ही खाजगीत जा असे सांगितले त्याचे मोबाईल व्हिडीओ रेकॉर्डींग माझ्याकडे असून मी जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांना पाठवले असल्याचे येथील ग्रामस्थ रमेश साकोरे यांनी सांगितले.

- रमेश साकोरे ( ग्रामस्थ )

केंदूर ता. शिरुर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत परिसरातील आठ गावे असून येथे महिलांची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबीरे घेतली जात असताना सर्प, श्वानसह आदी लसीकरणे नियमित होत असताना गेल्या काही महिन्यांपासून येथील वैद्यकीय सेवेचा बोजबारा झाल्याच्या तक्रारी आल्याने सरपंच प्रमोद पऱ्हाड यांनी स्वत: प्राथमिक आरोग्य केंद्रात भेट दिल्याने वीस हून अधिक महिला कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी डॉक्टरांची वाट पाहत असल्याचे तर आठवडे बाजारासाठी आलेले चाळीस हून अधिक बाह्यरुग्ण तपासणीसाठी ताटकळत उभे असल्याचे दिसून आले त्यावेळी चौकशी करताच रुग्णांना औषधे देणारा कर्मचारी देखील गायब असल्याचे निदर्शनास आले, दरम्यान सरपंचांनी तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांना संपर्क केला असता तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश कट्टीमणी यांनी बेजबाबदारपणे उत्तरे दिल्याने ग्रामस्थ संतापले, तर प्रशासनाने दखल घेत या गंभीर प्रकाराबाबत योग्य कारवाई न केल्यास गावच्या वतीने मोठे आंदोलन उभारणार असल्याचा इशारा सरपंच प्रमोद पऱ्हाड यांनी दिला आहे.

# बसस्थानक चौकातील उघड्या गटारीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## पारनेर नगर पंचायत कडून स्वच्छतेचा बोजवारा

■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : पारनेर शहरातील बसस्थानक चौकातील उघड्या गटारी मुळे प्रवासी व नागरिकांचे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या गटाराचे सांडपाणी प्रवाहित होत नसल्याने गटारीतील मैला व घाण आहे त्याच ठिकाणी साचून राहत आहे.

काही दिवसापूर्वी संबंधित ठेकेदारा यांच्याकडून गटार स्वच्छ करण्याचे काम करण्यात आले होते. पण जुजबी कारवाई केल्याने आहे ती समस्या जशीच्या तशी आहे. हि गटार निम्म्या पेक्षा जास्त घाण पाण्याने भरून गेली आहे.नगरपंचायत स्वच्छतेच्या नावाखाली शहरा साठी हजारो रुपये खर्च करते मग सर्व सामान्यांना असा प्रश्न पडतो की ही उघडी गटार दर्शनी भागात असूनही प्रशासनाला दिसत का नाही. ठेकेदार काम पूर्ण झाल्याचे दुसरीकडचेच फोटो टाकत तर



नाही ना असा प्रश्न उपस्थित होतो. मुख्याधिकारी पण खुर्ची सोडत नसल्याने शहरातील स्वच्छतेचा बोजवारा उडालेला आहे. ज्या प्रमाणात घरपट्टी व पाणीपट्टी साठी नागरिकांकडे तगादा लावला जातो त्या प्रमाणात शहरातील पाणी, वीज, व स्वच्छता हे प्रश्न गांभीर्याने

गटार बांधणे हे उपलब्ध निधीवर अवलंबून असून कोणते काम प्राधान्याने करावयाचे या बाबत सभा ठरवत असते. त्या मुळे हे सर्वस्वी सभेवर अवलंबून आहे

- विनय शिपाई मुख्याधिकारी, नगर पंचायत, पारनेर

बसस्थानक चौकातील गटारीची दुरावस्था झाली आहे या बाबत नगरपंचायत कर्मचाऱ्या मार्फत तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येईल.

- अशोक चेडे नगरसेवक,नगरपंचायत पारनेर

का सोडविले जात नाही. हि गटार निम्म्याच्या वर घाणीने भरून गेली आहे. सदर गटारिचे वाहते पाणी प्रवाहित केले नाही तर गटार पूर्ण भरून सांडपाणी रस्त्यावर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या अस्वच्छ गटारीच्या पाण्यामुळे सायंकाळचे वेळेस डासांचे प्रमाण जास्त असते त्या मुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नाकडे नगर पंचायत डोळे झाक करत असल्याचे जाणवत आहे. हा प्रभाग उपनगराध्यक्ष यांचा आहे असे असून. सुद्धा नागरी समस्या कडे डोळेझाक का केली जाते. असा प्रश्न सर्व सामान्य नागरिकांना पडत आहे. आता पर्यंत बऱ्याच वेळा विविध वर्तमान पत्रात या समस्याचे लक्ष वेधले गेले पण सराईत नगर पंचायत या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहत नाही. येरे माझ्या मागल्या असा प्रकार होत आहे. या बाबत नगर पंचायत सर्व नगरसेवक यांनी एक सभा घेऊन शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न मार्गी लावणे फार गरजेचे आहे.

# वारूळवाडी ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी प्रकाश भालेकर यांची निवड

■ जनप्रवास प्रतिनिधी

नारायणगाव : वारुळवाडी गावच्या ग्रामपंचायत उपसरपंचपदी प्रकाश गोविंद भालेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मावळत्या उपसरपंच रेखा फुलसुंदर यांनी राजीनामा दिल्यानंतर आज वारूळवाडी ग्रामपंचायत कार्यालयात निवडणूक प्रक्रिया पार पडली.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा सरपंच विनायक भुजबळ व ग्रामविकास अधिकारी सचिन उंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड प्रक्रियाअंतर्गत भालेकर यांचा एकमेव अर्ज आल्यानंतर दुपारी बारा वाजता उपसरपंच पदी भालेकर यांच्या निवडीची घोषणा करण्यात आली.



याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव काळे, पॅनल प्रमुख उद्योजक संजय वारुळे, सोसायटीचे माजी चेअरमन आशिष फुलसुंदर, जालिंदर कोल्हे, सचिन वारुळे, माजी उपसरपंच संतोष वाजगे, नंदू अडसरे, सुजित डोंगरे, माजी उपसरपंच माया डोंगरे, तंटामुक्त समितीचे उपाध्यक्ष शांताराम पारधी, संदीप अडसरे, राजेंद्र कडाळे, रामचंद्र भालेकर, माजी उपसरपंच ज्योती संते, नारायणगाव सोसायटीचे व्हाईस चेअरमन किरण वाजगे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. उपसरपंच पदी निवड झाल्यानंतर प्रकाश भालेकर यांनी सांगितले की, आदिवासी दिन दलित समाजातील व समाजातील शेवटच्या थरातील सामान्य माणसापर्यंत ग्रामपंचायतच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या योजना व सामाजिक कामे तळागाळात पोहोचवण्यासाठी प्रयत्न करणार.

या निवडीनंतर उपसरपंच भालेकर यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला त्यानंतर डीजेच्या तालात व गुलाल भंडारा उधळत भालेकर यांची ग्रामपंचायत वारुळवाडी कार्यालय ते भागेश्वर मंदिरापर्यंत मिरवणूक काढण्यात आली.

# मंदीर जीर्णोद्धार; दर्गा ट्रस्ट रद्दसाठी अन्नत्याग आंदोलन

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : संत शेख महमंद महाराज मंदिर जीर्णोद्धारासाठी अडथळा ठरणारे दर्गा ट्रष्ट बरखास्त करणे आणि वक्फ बोर्डाकडे केलली मंदिराच्या नोंद रद्द करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर दखल घेऊन प्रशासनाने आंदोलकाच्या मागण्या तातडीने विचारात घ्यावेत यासाठी जेष्ठ नेते घनश्याम शेलार यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.

दिनांक १७ एप्रिल पासून संत श्री शेख महंमद महाराज मंदिराचा जीर्णोद्धार होण्यासाठी हभप बंडातात्या कराडकर ,माणिक महाराज मोरे,जब्बार महाराज , यांच्यानेतृत्वाखाली वारकरी ,गावकरी याच्यासह लोकप्रतिनिधी ,सर्व राजकीय नेते मंडळीच्या उपस्थितीत भव्य मोर्चा , गाव बंद आंदोलन त्यावेळेस पासून धरणे आंदोलन तहसील कार्यालयांसमोर सुरू आहे.भजन, कीर्तन ,प्रवचन ,महाआरती असे कार्यक्रम सुरू असले तरी आंदोलनाच्या पहिल्या दिवशी पासून अजूनही प्रशासनाने आंदोलकांच निवेदन देखील घेतले नाही. प्रशांसनाने याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे.

प्रशासनानं अजून अजून आंदोलकाचे निवेदन स्वीकारले नाही.प्रशासनाने वारकरी ,गावकरी ,भक्तांच्या भावना विचारात घ्याव्यात तातडीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे बैठक लावून वक्फ बोर्डाकडे असलेली मंदिराची नोंद रद्द करावी. दर्गा ट्रष्ट रद्द करावे यासाठी घनश्याम शेलार यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे..

मागील चाळीस वर्षात असे प्रशासन आपण पाहिले नसून सर्वांच्या भावना अस्तनांना मंदिरात जीर्णोद्धार मधील अडथळे दूर करण्यासाठी प्रशासन ठोस भूमिका घेत नसल्याने अन्नत्याग आंदोलन सुरू केल्याचे शेलार यांनी सांगितले.यावेळी मनोहर पोटे ,गोपाळ मोटे, अशोक आळेकर, बाळासाहेब दूतारे,प्रा.बाळासाहेब बळे ,नाना कोथिंबीरे,सतिष मखरे, भोजराज मोटे,सुदाम झुंजरुक ,,अमोल पवार आदीसह गावकरी ,वारकरी या आंदोलन स्थळी उपस्थित होते आहेत

# डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे याने मानाच्या किताबाची अडीच लाखांची कुस्ती जिंकली

■ जनप्रवास प्रतिनिधी

नारायणगाव : उत्तर पुणे जिल्ह्यात सर्वात मोठ्या भरवल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायणगाव येथील ग्रामदैवत श्री मुक्ताबाई देवी व काळोबा देवस्थानच्या यात्रे निमित्त आयोजित केलेल्या लाल मातीवरील कुस्त्यांच्या आखाड्यात अनेक नामवंत पैलवानांच्या कुस्त्या झाल्या. विजेत्या पैलवानाना सुमारे १५ लाख रुपयांचे इनाम देण्यात आले. नारायणगाव केसरी या मानाच्या किताबाची कुस्ती डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे याने जिंकली. पै. राक्षे यांनी दिल्लीचा पैलवान संतकुमार याला चित्तपट करून २ लाख ५१ हजार रुपयांचे बक्षीस जिंकले.



आमदार शरद सोनवणे, विघ्नहरचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, देवस्थान ट्रस्टचे योगेश पाटे, संतोष नाना खैरे, एकनाथ शेटे,अशोक पाटे यांच्या हस्ते लावलेली शिवराज राक्षे व पैलवान संतकुमार यांच्यातील अखेरची कुस्ती लक्षवेधी ठरली. राक्षे याने लंके डाव टाकून संतकुमारला अवघ्या १ मिनटात चितपट केले. सायंकाळी साडेपाच वाजता आखाड्याचे पूजन देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी योगेश पाटे, संतोष नाना खैरे, एकनाथ शेटे, अशोक पाटे, संतोष वाजगे, विकास तोडकरी , अजित वाजगे, जयेश कोकणे, मकरंद पाटे, काका धावडे यांच्या हस्ते करून आखाड्याला सुरुवात झाली. रात्री दहा वाजेपर्यंत प्रकाश झोतात आखाडा सुरू होता. लाल मातीचा आखाडा व प्रेक्षकांना बसण्यासाठी खास स्टेडियमची सुविधा करण्यात आली होती. आखाड्यात झालेल्या ९० टक्के कुस्त्या ह्या निकाली व चुरशीच्या झाल्या. कुस्त्यांना प्रेक्षकांनी शिट्ट्या व टाळ्या वाजवून साद दिली.यावेळी माजी आमदार अतुल बेनके, देवदत्त निकम, भाजपच्या नेत्या आशाताई बुचके, ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष सुजित खैरे, कार्याध्यक्ष अनिल मेहेर, माजी अध्यक्ष प्रकाश पाटे, कुलस्वामी सहकारी संस्थेचे अध्यक्ष शंकर पिंगळे, गणपत फुलवडे,विघ्नहर देवस्थानचे माजी अध्यक्ष गणेश कवडे आदी मान्यवर उपस्थित होते.

ठळक वैशिष्ट्ये : सुरुवातीच्या पहिल्या टप्प्यात पाचशे रुपये ते पंधरा हजार रुपये पर्यंत इनामाच्या सुमारे ७० कुस्त्या झाल्या. पै.साईराज नलवडे आणि पै. गणपत शेटे, पै. माऊली येलभर आणि पै. जर्मन, पै. सौरभ मराठे आणि पै. सौरभ शिंदे, पै. विवेक नायकल आणि पै. प्रकाश कार्ले यांच्यातील पंचवीस हजार रुपये इनामाच्या कुस्त्या निकाली झाल्या.पै. हनुमंत पुरी आणि पै. प्रदीप ठाकूर,पै. ओंकार येलभर आणि पै. ऋषी लांडे, पै. महेश फुलमाळी आणि पै. सौरभ काकडे यांच्यातील ५१ हजार रुपये इनामाच्या कुस्त्या लक्षवेधी ठरल्या. भोल्या पंजाब व डीकॉक(अमेरिका) या पैलवानांमध्ये झालेल्या लक्षवेधी कुस्तीत डिकॉक विजयी झाला.

# भवरवाडी बंधाऱ्याचे काम निकृष्ट !

## शाखा अभियंता परिमल ह्याळीज यांची अंदाजपत्रक व माहिती देण्यास टाळाटाळ !

■ जनप्रवास प्रतिनिधी

पाथर्डी : महाराष्ट्र शासनाच्या मृदू आणि जलसंधारण विभागाच्या अंतर्गत मिडसांगवी ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या भवरवाडी शिवारात बंधारा केला जात आहे जवळपास बंधाऱ्याचे काम पूर्ण होत आले आहे त्यापूर्वीच बंधाऱ्याचे काम निकृष्ट असल्याची तक्रार दत्ता हजारे यांनी केली आहे या मृदू जलसंधारण विभागाचे शाखा अभियंता परिमल ह्याळीज यांना सदरील बंधाऱ्याचे अंदाजपत्रक तसेच माहिती मागितली असता त्यांनी माहिती देण्यास आणि अंदाजपत्रक देण्यास टाळाटाळ केली आणि उडवा उडवीचे उत्तरे दिली यामुळे परिमल ह्याळीज संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत सदरील बंधाऱ्याचे काम यापूर्वी एका छत्रपती संभाजीनगर येथील ठेकेदाराने मिडसांगवी येथील वाघमोडे वस्तीवर केले होते साधारणपणे दोन ते अडीच कोटी रुपये खर्च करून तयार करण्यात येत असलेल्या बंधाऱ्याचे काम अतिशय निकृष्ट केले गेले आहे .

मृदू आणि जलसंधारण विभाग कार्यकारी अभियंता पांडुरंग गायसमुद्रे यांना संपर्क केला असता त्यांनी शाखा अभियंता परीमल ह्याळीज यांच्याकडे बंधाऱ्याचे अंदाजपत्रक आणि माहिती देण्यास सांगितले असताना सुद्धा कार्यकारी अभियंत्याच्या आदेशाला केराची टोपली परिमल ह्याळीज यांनी दाखवल्याने वरिष्ठांचे आदेश न मानणारे परिमल ह्याळीज यांना निलंबित करावे.

बंधाऱ्याची भिंत बांधत असताना एक लोडसाठी फक्त ७ ते ८ सिमेंट गोण्या वापरण्यात आले आहेत बहुदा एका लोडसाठी १५ ते १७ सिमेंट गोण्या वापरणे आवश्यक होते.

जास्तीत जास्त क्रशअँड व खडीचा वापर करून सिमेंट बचत केली मिडसांगवी वाघमोडे वस्तीवरील बंधाऱ्याचे खोलीकरण रुंदीकरण यापूर्वीही केले गेले नाही आणि या भवरवाडी शिवारातील बंधाऱ्याची सुद्धा तीच परिस्थिती आहे बंधाऱ्याच्या भिंतीला बांधकाम करताना पाणी न दिल्याने बंधाऱ्याच्या भिंतीला तडे गेले आहेत .

यामुळे सदरील बंधाऱ्याचे काम पूर्णपणे निकृष्ट करून फक्त ठेकेदाराला आर्थिक लाभ मिळवण्याच्या दृष्टीने मृदू आणि जलसंधारण विभागाचे शाखा अभियंता परिमल ह्याळीज यांनी ठेकेदाराशी आर्थिक तडजोड केल्याचे बोलले जात आहे यामुळे मृदू आणि जलसंधारण विभाग नाशिक आयुक्त हरिभाऊ गीते यांच्याकडे लेखी तक्रार करून कॉलिटी कंट्रोल मार्फत सदरील बंधाऱ्याची तपासणी करून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेका एजन्सी ब्लॅक लिस्ट करून देयके तात्काळ थांबवावीत अशी मागणी दत्ता हजारे यांनी केली आहे.



# स्त्रियांना आपल्याला जीवनातून काय मिळवायचं हेच समजत नाही



एका संशोधनानुसार, महिलांना नेहमी पती, मुलं, मित्र-मैत्रिणी, शेजारी आणि त्यांचं खासगी जीवन महत्त्वाचं वाटतं; पण स्वतःला मात्र त्या जमेत धरत नाहीत. कदाचित हा त्यांच्या उपजतच गुण असावा. दुसऱ्यांना सतत प्रसन्न ठेवणे. एवढेच त्यांना ठाऊक असते.स्त्रिया आपल्या आवडीच्या माणसांना खूष ठेवण्याचा जास्त प्रयत्न करतात. एक पत्नी आणि आईची भूमिका निभावताना आपल्याही काही प्राथमिक गरजा आहेत, हे त्या विसरूनच जातात. त्याचाच परिणाम म्हणून बऱ्याचशा स्त्रियांना आपल्याला जीवनातून काय मिळवायचंय हेच समजत नाही. स्वतःला महत्त्व देणे हे आरोग्य आणि मानसिक संतुलनासाठी आवश्यक आहे. आपल्या गरजा काय आहेत, हे समजून घेऊन आनंदी राहण्यासाठी त्या पूर्ण केल्या पाहिजेत. आपल्या गरजांना कुणीतरी दुसरे समजून घेतील या भरवशावर राहिल्यास पदरी केवळ निराशाच पडेल.

नकारात्मक विचारांची साथ सोडा

आशावादी राहूनच आपण सर्व अडचणींना तोंड देऊ शकतो. त्यांवर विजय मिळवू शकतो. पॉझिटिव्ह विचारांमुळे आपली इम्यून सिस्टिम चांगली राहाते. या पॉझिटिव्ह विचारांचे महत्त्व पाहाता आज कित्येक लहान-मोठ्या शहरांमध्ये लाफटर क्लब उघडण्यात आले आहेत.

माइंड सेट बदला : दुसऱ्यांच्या भरवशा-वर जगणं सोडून द्या. स्वतःवर विश्वास ठेवा. सर्वांत चांगले बनण्याच्या नादात स्वतःलाच संपवू नका. आपल्या उणिवांसह स्वतःला स्वीकार करायला शिका. कधी-कधी तडजोड करायला काहीच हरकत नाही आणि हे तेव्हाच घडू शकते जेव्हा आपण स्वतःला त्या योग्यतेचे बनवू शकू. जीवनात व्यवस्थित राहून आपल्या प्राथमिकता ठरवा. आपल्या गरजा ओळखा : तुम्ही जर तुमच्या गरजा ओळखू शकत नसाल, तर हीच गोष्ट तुम्हाला आतल्या आत सतावत राहील. याने, राग निर्माण होऊन तो तुमच्या व्यक्तिमत्त्व विकासास बाधक ठरू शकतो. विवेक आणि कर्तव्याचा जोरावरच आपल्याला आपला आनंद मिळवायचाय. जे मिळालंय, त्याचा आदर राखा आपल्याजवळ बरंच काही असतं; पण आपलं त्याकडे कधी लक्षच जात नाही. आपण जे काही मिळवलंय किंवा जे काही मिळालंय त्याचा आदर करायला शिका. इतरांवर एकसारखा आरोप करणे, ईर्ष्या करणे या गोष्टी सोडून द्या.

पुढे चालता राहा : कुणी जर आपल्याशी वाईट वागले असेल किंवा कुणी आपले वाईट केले असेल, तर एकसारखा तोच विषय डोक्यात घेऊन कुढत बसण्यापेक्षा त्यातून बाहेर पडावे. अन्यथा, त्यातून होणारे नुकसान आपल्यालाच भोगावे लागेल. हे जीवन एकसारखं मिळत नसतं; ते एकदाच मिळतं.

त्यामुळे त्याला अशाप्रकारे वाया घालवू नका. 'क्षमा करा आणि विसरू जा' या नीतीचा अवलंब करून पुढे पुढे चालत राहा. असे केल्यास, जीवन तुमचे स्वागत करायला तुम्हाला आनंद द्यायला सदैव तयार असल्याचे दिसून येईल.

वर्तमानात जगा आणि भरपूर एन्जॉय करा. अशा रीतीने जगा की, तुमच्या जीवनाकडे आणि जगण्याच्या ढंगाकडे पाहन लोकांनीच म्हणावे, ''व्वा ! लाइफ हो तो ऐसी.''



# स्तुतीप्रिय होऊ नका

ज्याला नेहमी स्वत:ची स्तुती वाहवा ऐकण्याची सवय असते. आपल्या होकाराला होकार देणारी माणसे आवडतात तो स्तुतीप्रिय माणूस असतो व तो त्यासाठी सतत दुसऱ्यांनाही हरबऱ्याच्या झाडावर चढवत असतो. पण ही माणसे जशी तोंडावर गोड बोलणारी, स्तुती करणारी असतात तशीच ती कधी उलटतील याचाही नेम नसतो. अशावेळी ही माणसे अधिक हिंसक वृत्तीची होतात. साधारणपणे ज्यावेळी यांचा कार्यभाग साधत नाही वा यांचे म्हणणे एखादा ऐकत नाही असे वाटू लागताच ही चिडून बेभान होतात. आज स्वार्थी माणसांची वाणवा नाही. आपला स्वार्थ साधण्यासाठी ते एखाद्याला अगदी डोक्यावर घेतात .

त्याच्या पुढे पुढे करतात.आपण अगदी जिवाभावाचा मित्र असल्यासारखे वागतात, पण तेच स्वार्थ साधताच अशी पाठ फिरवतात की आपल्याला प्रश्न पडतो, हाच तो आपला मित्र आहे का? स्वार्थासाठी गाढवालाही आपला बाप करणारी ही जात असते.

# सुरकुत्या नष्ट करण्यासाठी प्रथम जमिनीवर अथवा खुर्चीवर सरळ बसावे



साधारणत: वाढत्या वयाबरोबर त्वचेतील पेशींची क्रियाशीलता कमी होत जाते. परंतु नियमित स्वरूपात योग्य व्यायाम केल्याने यापेशी सदैव ॲक्टिव्ह राहू शकतात. यामुळे चेहरा व मान या भागांतील सुरकुत्यांवर अटकाव होतो आणि त्वचेतील ताण टिकून राहातो. यासाठी योग्य व्यायाम आणि उचित खानपानाची आवश्यकता असते. यामुळे त्वचा तरूण राहण्यास साह्य मिळते.तथापि एक वेळ अशी येते की, त्वचेची लवचिकता कमी होऊन चेहऱ्याची चमक कमी होते आणि वाढते वय दिसून येते. त्वचेची अशी स्थिती होण्यामागची अनेक कारणे आहेत, जसे शरीराचे वजन एकदम कमी होणे, व्यस्त जीवनशैली, वयाचा परिणाम, आहारातील पोषक तत्वांचा अभाव, ताण-तणाव वगैरे या सर्व कारणांमुळे त्वचेतील ताण कमी होऊन त्यावर सुरकुत्या येऊ लागतात. या कारणे चेहऱ्याला आकर्षपणा कमी होतो.प्रत्येकाची इच्छा असते, की आपण तरूण आणि सुंदर दिसावे. म्हणून कित्येक महिला आपल्या वाढत्या वयाचा परिणाम कमी करण्यासाठी कित्येक प्रकारचे ब्यूटी प्रॉडक्टस्‌चा उपयोग करतात. तसेच ब्यूटीपार्लर्सचा आधार होतात.

० मानेच्या भागातील सुरकुत्या नष्ट करण्यासाठी प्रथम जमिनीवर अथवा खुर्चीवर सरळ बसावे आणि डोके मागच्या बाजूला वाकवून आकाशाकडे पाहावे.

या दरम्यान ओठ बंद ठेवून तोंडाची हालचाल अशाप्रकारे करावी, जणू आपण काही चावत आहात. आपणास जाणवेल, की आपल्या मानेच्या नसांत ताण आला आहे, असे वीस ते तीस वेळा करावे.काही दिवसांतच प्रभाव दिसून येईल.

० हनुवटीला योग्य आकार आणण्यासाठी डोके मागच्या दिशेने नेऊन तोंड उघडावे आणि पुन्हा बंद करावे. असे पंधरा ते वीस वेळा करावे. लवकरच आपल्या हनुवटीला योग्य शेप येईल.

० चेहऱ्याची त्वचा आकर्षक होण्यासाठी चेहऱ्याचे स्नायू ओढून घ्यावेत आणि पुन्हा शिथिल करावेत. नंतर जबडा खोलावा आणि ताणून बंद करावा, असे कमीत कमी वीस वेळा करावे. याने चेहऱ्याच्या भागातील नसांवर ताण येऊन चेहऱ्याची त्वचा आकर्षक व तरूण दिसू लागते.

० भुवया आणि त्यांमधील भागात लवकर सुरकुत्या दिसू लागतात. यासाठीही व्यायाम उपयुक्त ठरतो यासाठी प्रथम आपल्या भुवया वरच्या दिशेने ताणून घ्याव्यात आणि डोळे जास्तीत जास्त उघडण्याचा प्रयत्न करावा. अशा प्रकारच्या साध्या-साध्या व्यायामांनी चेहरा आकर्षक होण्यास मदत होईल.

# जेवण हे साध्य नसून शरीर तरतरीत व तंदुरुस्त ठेवण्याचे साधन



काहीजण म्हणतील हा काय प्रश्न झाला. भूक लागली की जमेल तसे जेवावे. परंतु हे योग्य नव्हे. कारण आपण शरीर क्रियाशील राखण्यासाठी व निरोगी ठेवण्यासाठी जेवत असतो. जेवण हे साध्य नसून शरीर तरतरीत व तंदुरुस्त ठेवण्याचे साधन आहे.

- जेव्हा थकले-दमलेले असाल तेव्हा जेवू नका. थोडेसे फ्रेश होऊनच जेवा. यासाठी तोंड, हात, पाय धुणे व डोळ्यांवर पाण्याचा सपकारा मारणे हा उत्तम व स्वस्त उपाय आहे.
- ठराविक वेळीच जेवा. शांत चित्ताने, मांडी घालून, तणावरहित होऊन जेवावे. अन्न व्यवस्थित चावून खाल्ल्यामुळे ते सुपाच्य होते व चटकन पचते. त्यात लाळ जास्त प्रमाणात मिसळते. पोटातही पाचक द्रव्यांची पचनास मदत होते.
- भूक असेल तरच जेवावे. शक्यतो ठरलेल्या वेळीच जेवावे. जर भूक नसेल तर एखाद्या वेळचे जेवण रद्द करावे.
- भुकेच्या वेळी जेवण न केल्यास खूपच हानी होते.
- भूक टाळणे योग्य नव्हे. यामुळे अशक्तपणा येऊ लागतो.
- फक्त दोन मुख्य जेवणे करावीत व एकदा नाश्ता घ्यावा. तीनदा जेवण घेतल्यानेही माणूस रोगट होतो.
- नाश्ता व दुपारच्या जेवणात ४ तासांचे अंतर असावे. दोन्ही मुख्य जेवण्यात ७ तासांचे अंतर असावे. रात्रीच्या जेवणात व नाश्त्यामध्ये ११ तासांचे अंतर योग्य समजले जाते.
- झोपण्यात व जेवणास तसेच सेक्स व रात्रीचे जेवण यामध्ये किमान दोन तासांचे अंतर असावे. रात्रीच्या जेवणानंतर शतपावली म्हणजेच फिरणे आवश्यक असते.
- आठवड्यातून एक उपवास करावा व त्या दिवशी हलका आहार घ्यावा.
- अन्न चावून खाल्ल्यास दात व हिरड्यांना बळकटी येते.
- भूक लागल्यानंतर जेवल्यास अन्न सहजतेने पचते. ढेकर शुध्द येतात. गॅस कमी तयार होतो व सहजपणे बाहेर पडतो.

# डाएटिंग करा व सुंदर दिसा



डाएटिंग करून सुंदर व तरूण दिसू इच्छिणाऱ्या महिलांनी लक्ष द्यावे. जर खऱ्या वयापेक्षा दसपटीने तरूण दिसायचे असेल, तर डाएटिंग सोडून खाणे सुरू करा. कारण उत्तम आहारच स्मार्ट लूक व तरूण दिसण्याचा उत्तम उपाय आहे.

पॅट्रिक हॉलफोर्ड या ब्रिटीश न्यूट्रीशनिस्टच्या मते, उत्तम पौष्टिक आहार घेतल्यास माणूस आपल्या खऱ्या वयापेक्षा दसपटीने तरूण दिसतो.

त्याच्या मते चेहऱ्यावर येणारी पहिली सुरकुती, विस्मरण व वय होणे हे ऑक्सिडेशनवर अवलंबून असते. या प्रक्रियेत शरीराचा रोम रोम डीएनएची चादर पांघरण्यास सुरूवात करते.

'द टाइम्स' या वृत्तपत्राने हॉलफोर्ड यांच्या दाव्यानुसार लिहिले आहे की, ॲण्टीऑक्सिडेंटने ओतप्रोत असलेले पदार्थ खाल्ल्यास शरीरातील सर्व प्रणालीतील उतारवय होण्याच्या प्रक्रियेला ब्रेक बसतो.

हॉलफोर्ड यांच्या मतानुसार दररोज किमान पाच प्रकारची फळे वा भाज्या खायला हव्यात; परंतु कॅन्सर वा इतर आजारांपासून सुरक्षित राहण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने मात्र ८ ते १० प्रकारची फळे व भाज्या खाण्याचा सल्ला दिला आहे. ■■■

# मनात कोणती इच्छा बाळगाल



तारुण्यात सर्वच गोष्टी पुढे येण्याची इच्छा असते. प्रत्येक खेळाचा एक नियम असतो व तो म्हणजे जिंकण्यासाठी प्रयत्न करणे. बक्षिसे सर्वांनाच समान वाटली जात नाहीत. ती फक्त जिंकणाऱ्यांनाच वाटली जातात. जेव्हा एखादी व्यक्ती जिंकत नाही तेव्हा एखादी व्यक्ती जिंकते, तेव्हाच दुसऱ्याला जिंकण्याचे समाधान मिळते. एखाद्याच्या कामगिरीवर तो किती प्रमाणात इतरांचे आकर्षण बनतो, हे अवलंबून असते. अशी कामगिरी मनापासून आवडत नसली तरी अनेकांना त्यासाठी प्रयत्न करावे लागतात, ही आजकाल समाजात रुढ झालेली बाब आहे. तरुण यासाठी सर्वच बाबतीत पुढे राहण्याचा प्रयत्न करतो. स्त्रिया संपूर्णपणे मुक्त नसतात. लहान मुलगी आधी आपल्या आईशी स्पर्धा आणि त्यानंतर चढाओढ करते. त्यानंतर ती शाळेतील आपली कामगिरी उत्कृष्ट करण्याचा प्रयत्न असतो. तिला चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हायचे असते किंवा पहिला क्रमांक पटकावायचा असतो. त्यासाठी ती स्पर्धा करते. ती ज्या माणसाशी लग्न करते, त्याच्याशी स्पर्धा करू पाहते. तिला निश्चित होण्यासाठी आपल्या पतीवर भरपूर प्रेम करावेसे वाटते. ज्या माणसाला काही महत्त्व आहे, काही मान आहे. ज्याच्याकडे चांगली स्थिती आणि पैसा आहे. अशा माणसाशी तिचा विवाह करणे इष्ट वाटते. तिला चांगले लग्न करायचे असते.

अशाप्रकारे स्त्री आणि पुरुष दोघांच्याही मनात स्पर्धेची इच्छा असते. त्यांच्या मनात काही महत्त्वाकांक्षा असतात. या दोन गोष्टींमुळे स्त्रियांपेक्षा पुरुष जास्त उत्तेजित होतात, असे समाजात दिसून येते. पण आता काळ बदलतोय. स्त्रियाही पुरुषांच्या बरोबरीने चालत आहेत. पालक आपल्या मुलांच्या स्पर्धात्मक भावनेला खतपाणी घालतात आणि त्यामुळेच घरातील संबंधामध्येही स्पर्धात्मक भावना निर्माण होते. पालकांची मुलांच्या प्रेमासाठी आणि बहीण-भावंडांची पालकांच्या प्रेमासाठी स्पर्धा लागते. शाळेत, मैदानावर स्पर्धेला उत्तेजन दिले जाते. मानासाठी आणि काही गोष्टींच्या प्राप्तीसाठीही आजकाल प्रचंड स्पर्धा करावी लागते.

आपल्या सर्वच गोष्टी स्पर्धेशी आणि सामर्थ्याशी जोडल्या गेल्या आहेत. यामागे केवळ इतिहास, परंपरा किंवा धार्मिक गोष्टी नाहीत, तर त्यामागे श्रीमंती, समृद्धीसुद्धा आहे. आपण भरपूर संपत्ती मिळविण्यासाठी आणि आपला मान वाढविण्यासाठी विविध प्रशिक्षणे घेतो, पण प्रेमाच्या क्षमतेसाठी कुठलीही प्रशिक्षण संस्था नाही. कुठल्याही मोठ्या श्रीमंत माणसाला प्रेमाची शाळा काढण्याची इच्छा होत नाही. आपल्या जीवनात भौतिक वस्तूचे व इतर गोष्टींचे महत्त्व वाढले असतानाही आजही प्रत्येकाला जीवनात प्रेम ही मुख्य महत्त्वाची गोष्ट आहे. आपण भौतिक गोष्टी प्राप्त केल्यानंतर त्यापासून आपल्याला सन्मान मिळतो. थोडेफार समाधानही मिळते. पण हे समाधान परस्परांची आवश्यकता आणि त्यात मिळणारे समाधान देऊ शकत नाही. वस्तूपासून मिळणारे समाधान आपले एकटेपण घालवू शकत नाही. ते आपली काळजी, अस्वस्थता मिटवू शकत नाहीत. आजच्या जगात भौतिक वस्तूंचे महत्त्व कोणीही नाकारणार नाही. आर्थिक यश हे सर्वांनाच हवे असते. प्रत्येक गोष्टीला किंमत असते. त्यामुळे जगात पैशानेच सर्व गोष्टींचे मूल्य ठरविले जाते, असे लोकांना वाटते. परंतु ही झाली जीवनातील एक बाजू. जीवनाच्या दुसऱ्या बाजूस आपण लोक असलेल्या जगात जगतो, हे समजून घ्यायला हवे. आपण कितीही संपत्ती मिळवली तरी आपल्याला भावनिक समाधान केवळ आपल्या जिव्हाळ्याच्या लोकांपासूनच मिळू शकते. इतरजण आपल्याला मान देत असतील आणि प्रतिष्ठेने वागवत असतील, तरीपण घरातील भूमिका सर्वात महत्त्वाची आणि मूल्यवान असते. घरात आपण आपली सामाजिक प्रतिष्ठा सहसा आणता कामा नये. तुम्ही तुमच्या लहान मुलाशी सामान्य वडिलांसारखेच वागले पाहिजे. त्याला तुम्ही प्रेम दिले, तर तोही तुम्हाला तसेच प्रेम देईल. सर्वच गोष्टी विकत घेता येत नाहीत, हे आपण लक्षात ठेवायला हवे.

# साध्या डोकेदुखीपेक्षा अर्धशिशीच्या वेदना जास्त



डोकेदुखी फक्त मोठ्या माणसांतच नव्हे तर अगदी अजाण बाळांमध्येही होत अजाण बाळांमध्येही होत असते. अशी मुले ते सांगू शकत नाहीत; त्यामुळे जास्त रडतात व वारंवार डोळ्यावर हात फिरवतात. दूध पित नाहीत व मलूल दिसतात.

डॉक्टर म्हणतात की, तणाव, डोकेदुखी व अर्धशिशीचा त्रास मोठ्याप्रमाणेच छोट्यानांही होत असतो. तणावामुळे होणारी किंचित डोकेदुखी तीन मिनिटे ते सात तासांपर्यंतची असू शकते आणि अर्धशिशीचा त्रास ७२ तास राहातो. बऱ्याचदा ही डोकेदुखी महिनाभरही राहते. बहुतेक डॉक्टरांच्या मते साध्या डोकेदुखीपेक्षा अर्धशिशीच्या वेदना जादा असह्य असतात.

कारणे : मुलांच्या डोकेदुखीची अनेक कारणे सांगितली जातात. उदा. बाळाच्या डोक्याला पूर्वी कधी मार लागला असेल तर पूर्णपणे बरा झाल्यानंतरही कधी कधी डोके दुखत राहाते.

कान व नाकात एखादे इन्फेक्शन झाले असेल तर डोकेदुखी असते. अशावेळी अर्धशिशीचा त्रासही राहातो.

सर्दी, वातावरणातील बदल, तीव्र आवाज, प्रदूषण, तीव्र प्रकाश ही मुख्य कारणे आहेत.

याशिवाय मोठ्याप्रमाणेच चिंता- तणाव व उदासीनतेमुळे आठ वर्षांपुढील मुलांना डोकेदुखी होते.

डोकेदुखीवर नियंत्रण -

साधी असो वा खूप त्रासदायक कोणत्याही डोकेदुखीवर नियंत्रण करता येऊ शकते. प्रत्येक डोकेदुखीबाबत डॉक्टरांचा सल्लाच घ्यायला हवा असे काही नाही. साध्या डोकेदुखीवर आपण घरगुती उपाय करु शकता.

जास्त वेळ उन्हात खेळणे, रात्री जास्त जागणे, आवाज वाढवून टी.व्ही. पाहणे इ. मुळे डोकेदुखत असेल तर ते साध असते आणि आपोआप थांबते; परंतु जी डोकेदुखी अनेक आठवडे, महिने राहते; त्याकडे पालकांनी लक्ष द्यायला हवे व अशा मुलांसाठी डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.

मुलाला अशा प्रकाराचा त्रास होऊ नये यासाठी पालकांनी दक्षता घ्यायला हवी. जर अशी स्थिती उद्भवली तर डोकेदुखीच्या प्राथमिक अवस्थेतच अंधाऱ्या खोलीत झोपवावे; म्हणजे झोप व्यवस्थित पूर्ण होऊन त्याला हलके वाटू लागेल. त्याच्या छोट्या छोट्या चिंता, ताणांची उपेक्षा न करता त्याचे लवकरात लवकर निरसन करावे.

जास्त वेळ उन्हात खेळण्याची परवानगी देऊ नये. खूप वेळ टीव्ही पाहाणे, तीव्र वा अंधुक प्रकाशात लिखाण वाचन करणे, टेबललॅम्पच्या प्रकाशात अभ्यास करणे इ. गोष्टी टाळाव्यात. पाचव्या वर्षानंतर ध्यान व योगाचा अभ्यास करुन घ्यावा. त्यामुळे सर्दी, खोकला, अपचन व डोकेदुखीपासून त्याचे रक्षण होईल. ■■■

# बाळाच्या संगोपनात अनेक समस्या



एकत्र कुटुंबात बाळाच्या देखभालीचा विशेष त्रास नसतो. कारण छोट्या बाळाजवळ सतत कोणी ना कोणी असते. घरातील आजी-आजोबा, दीर-नणंदा वा इतर माणसे बाळाकडे लक्ष द्यायला असतात.

पण पती-पत्नी असे दोघेजण घरात असले तर बाळाच्या संगोपनात अनेक समस्या निर्माण होतात. अशावेळी पतीचीही काही जबाबदारी असते. त्यामुळे पत्नीला बाळाची योग्य देखभलही करता येते व रोजचे घरकामही उरकता येते.

पतीने रोज सकाळी लवकर उठण्याची सवय लावून घ्यावी. त्यामुळे पत्नीला फ्रेश होण्यासाठी लागणाऱ्या वेळेत तो बाळाची देखभाल करु शकेल.

पतीला जर रोज बेड टी घेताना वृत्तपत्र वाचण्याची सवय असेल व त्याचवेळी बाळ रडू लागले तर पत्नीवर न रागावता, न चिडता बाळाला शांत करण्याचा प्रयत्न करावा.

आपली लहानसहान कामे स्वत:च करावीत. त्यामुळे पत्नी बाळाकडे जास्त लक्ष देऊ शकेल.

दुसऱ्या दिवशी जेवणासाठी आपल्याला काय हवे याची कल्पना पतीने पत्नीला आदल्या दिवशीच द्यावी म्हणजे बाळ झोपल्यानंतर तशी पूर्वतयारी पत्नी करु शकेल.

ऑफिसात सुटल्यानंतर मित्रामंध्ये वेळ न घालवता घरी लवकर यावे. त्यामुळे दिवसभर बाळाला सांभाळणाऱ्या पत्नीला थोडा दिलासा व आराम मिळेल.

पत्नीला पूर्व सूचना न देता मित्रांना वा कोणालाही घरी बोलावू नये. सुटीच्या दिवशी जास्तीत जास्त वेळ पत्नी व बाळासोबत घालवावा. आपली पत्नी जेवली की नाही याची चौकशी करा. ती जेवेपर्यंत बाळाला सांभाळा.

आपण ऑफिससाठी भराभर आवरुन तयार व्हावे, जेणेकरुन आपण थोडावेळ बाळाला सांभाळू शकाल. त्या काळात पत्नी आपल्यासाठी नाश्ता व डबा तयार करु शकेल.

जर आपण बाळाला सांभाळले नाही तर पत्नी ही कामे करु शकणार नाही व आपल्याला ऑफिसला उशीर होईल.

# बोलताना डोकं खाजवणं कमी आत्मविश्वास दर्शवितो



तुम्ही अबोल असता, पण तुमच्या शरीराच्या हालचाली खूप काही बोलून जातात. तुमच्या सवयी, तुमचा स्वभाव आणि तुमच्या मनातील गोष्टीदेखील तुमच्या हालचालींतून लक्षात येतात.

■ बोलताना डोकं खाजवणं, हात चोळणं किंवा नाक खाजवणं तुमच्यातला कमी आत्मविश्वास दर्शवितो.

■ शांत बसले असताना पाय हलवणं, कुठल्यातरी वस्तूशी चाळे करणं, सारखं-सारखं उठून बसणं, चादर नीट करणं, मनातील अस्थिरता प्रकट करते.

■ बोलत नसतानाही सहजपणे वावरणं, नजरेत आणि व्यवहारात सहजपणा आणि पूर्ण आत्मविश्वास असणं तुमची स्थिर मानसिकता आणि आत्मविश्वास दाखवतो.

■ सारखं दचकणं, आपल्याच विचारात चालणं, संथ हालचाली करणं, तुमच्या मनातील भ्रम आणि निराशा प्रकट करतो.

■ जोरात चालणं, कागद वा कुठल्या वस्तू चोळामोळा करणं, वस्तू ठेवताना आवाज करणं, चालताना पायांचा आवाज करणं, खाताना तोंडाचा आवाज करणं तुमच्यातील उर्मटपणा प्रकट करतो.

■ न बोलूनसुद्धा तुम्ही समोरच्या व्यक्तीवर तुमचा हालचालींतून आणि वागण्यातून चांगला किंवा वाईट प्रभाव पाडत असतो.

■ सतत हसरा चेहरा, तत्पर हालचाली, चालण्यात, बसण्यात आणि काम करण्यातील उत्सुकता तुमच्यातील प्रसन्न व्यक्तीमत्व किंवा आनंद प्रकट करते.

# अक्षय्य तृतीयेला मिठाचे पाणी व या पदार्थात भिजवा तांबा, पितळ, चांदीची भांडी व देव मुर्ती, न घासताच चमकतील वस्तू

अक्षय्य तृतीया हा हिंदू धर्मातील सर्वात महत्त्वाचा आणि सोनेरी दिवस मानला जातो. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असल्यामुळे या दिवशी केलेले कोणतेही कार्य अक्षय्य टिकते. म्हणून या दिवशी लोक सोन्याची खरेदी करतात शिवाय घरंही साफसुफ चमकवून ठेवतात. तुम्हालाही या दिवसासाठी तांबा, पितळ व चांदीची भांडी फ्रीमध्ये चमकवायची असतील तर लगेच ट्राय करा हे उपाय.

स्वयंपाकघरातील पितळ आणि तांब्याची भांडी काही घरांची खास ओळख असते. या भांड्यांचे सौंदर्य आणि धार्मिक महत्त्वही खूप आहे. पूजेमध्ये वापरली जाणारी ही भांडी वेळोवेळी स्वच्छ ठेवली जातात, पण काही काळ वापर न केल्यास त्यावर काळसर थर बसतो. ही भांडी पुन्हा पूर्वीसारखी चकाकती ठेवण्यासाठी अनेकजण महागड्या क्लिनिंग पावडर किंवा रसायनांचा वापर करतात. मात्र त्यातून कधी भांड्यांचा रंग उतरतो, तर कधी हाताला इजा होते.

जर तुम्हालाही तुमच्या घरातील पितळ, तांबे किंवा चांदीची भांडी चमकवायची असतील आणि तीही कमी खर्चात व घरगुती पद्धतीने, तर तुमच्यासाठी खास काही टिप्स घेऊन आलो आहोत. हे उपाय अगदी सहज, सोपे आणि पर्यावरणपूरक आहेत. घरात असणाऱ्या छोट्या छोट्या गोष्टी वापरून तुम्ही ही भांडी परत नव्यासारखी करू शकता. चला तर मग, हे प्रभावी उपाय जाणून घेऊया.



**लिंबू, चिंच आणि मीठ**

पिढ्यानपिढ्या चालत आलेला हा उपाय अजूनही तितकाच प्रभावी आहे. लिंबाच्या रसात मीठ मिसळून हे मिश्रण भांड्यांवर लावून हलक्या हाताने घासल्यास, भांड्यावरील काळपटपणा दूर होतो. चिंच पाण्यात भिजवून तिच्याच गराने भांडी घासली, तरी ती झळाळून निघतात. याशिवाय, चिंच, मीठ आणि लिंबाचा रस एकत्र करून उकळत्या पाण्यात भांडी टाकली, तर अजून परिणामकारक परिणाम दिसून येतो. यामुळे भांडी नवीन असल्यासारखी चमकतात.

**टूथपेस्ट आणि टोमॅटो केचअप**

टूथपेस्टमध्ये असणाऱ्या सौम्य रसायनांमुळे पितळ आणि तांब्याची भांडी सहज स्वच्छ होतात. अर्धा चमचा टूथपेस्ट, थोडे मीठ आणि डिश वॉश लिक्विड एकत्र करून तयार केलेली पेस्ट भांड्यांवर लावून स्पंजने घासावी. दुसरीकडे, टमाटर केचपमध्ये असणाऱ्या आम्लीय गुणधर्मांमुळे काळसर डाग सहज निघतात. केचअप लावून काही वेळ भांडी ठेवून द्या आणि नंतर स्क्रबरने घासा. भांडी झळाळून निघतील.

**बेकिंग सोडा, व्हिनेगर आणि लिंबू**

बेकिंग सोडा आणि व्हिनेगर हे भांडी साफ करण्यासाठी सुद्धा उत्तम पर्याय आहेत. एका भांड्यात गरम पाणी घेऊन त्यात बेकिंग सोडा आणि लिंबाचा रस घाला. या पाण्यात पितळ किंवा तांब्याची भांडी २० ते ३० मिनिटांसाठी ठेवा. त्यानंतर हलक्याच स्क्रबरने घासून धुवून टाका. दुसरीकडे, व्हिनेगरमध्ये मीठ मिसळून हे मिश्रण थेट भांड्यांवर लावले तरी उत्तम परिणाम मिळतो. हे उपाय विशेषतः पूजेची भांडी आणि दिवे चमकवण्यासाठी उपयोगी पडतात.

**मीठ आणि सायट्रिक ॲसिडचा सोपा उपाय**

पितळ आणि तांब्याच्या भांड्यांवरील काळपट थर काढण्यासाठी मिठासह सायट्रिक ॲसिडचा वापर अतिशय प्रभावी ठरतो. एका मोठ्या परातीत दोन कप पाणी घ्या, त्यात एक चमचा मीठ आणि एक चमचा सायट्रिक ॲसिड मिसळा. हे मिश्रण एकजीव करून त्यात भांडी ३० मिनिटांसाठी बुडवून ठेवा. त्यानंतर नुसत्या पाण्याने धुवून घ्या. घासण्याची आवश्यकता नाही आणि भांडी चमकून उठतात. या उपायात वेळ, पैसा आणि मेहनत तिन्हींची बचत होते.

**चांदी आणि इतर धातूंवरील खास घरगुती टिप्स**

चांदीची भांडी स्वच्छ करण्यासाठी कोलगेट पावडर, व्हिम लिक्विड किंवा रांगोळी-मीठ यांचे मिश्रण वापरले जाते. ही पावडर थोड्या पाण्यात मिसळून वापरल्यास देवाच्या मूर्ती किंवा चांदीची भांडी पुन्हा उजळून निघतात. तांदळाचे पीठ, चणाडाळीचे पीठ आणि व्हिनेगर एकत्र करून जाडसर पेस्ट तयार केली, तर ती दिव्यांवर लावून सुकल्यानंतर धुतल्यास दिवे चमकतात. हे उपाय केवळ खर्चिक क्लिनरला पर्याय नाहीत, तर आरोग्यदृष्ट्याही सुरक्षित आहेत.

**टिप :** हा लेख केवळ सामान्य माहितीच्या उद्देशाने आहे. हा वैद्यकीय सल्ला, निदान किंवा उपचारांचा पर्याय नाही. अधिक तपशीलांसाठी नेहमी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

■■■

# काम वेळेवर केले तर तणाव होतो गायब

आजकाल कित्येक लोक चिंताग्रस्त असल्याचे दिसून येते. तर कित्येक लोक कोणतेही काम करण्याअगोदर अधिक वेळ विचार करण्यातच घालवितात. याचा अशा व्यक्तींच्या शरीरावर वाईट परिणाम होतो आणि कोणतेच काम व्यवस्थित होत नाही. अशावेळी कोणतेही काम वेळेतच करणे उचित ठरेल. यामुळे कोणत्याही प्रकारचा तणाव जाणवणार नाही.

खरे तर कोणतेही काम करताना त्यावर विचार करण्यात वेळ घालविल्याने अशी व्यक्ती तणावग्रस्त होऊ शकते.

परंतु वेळ न घालविता कोणतेही काम वेळेवर केल्याने तणाव येत नाही. आपल्या शरीराची त्वचा दिवस-रात्री निरंतर कार्य करीत असते. तणावाचा त्वचेवर सर्वाधिक परिणाम होत असतो. म्हणूनच नेहमी तणाव आणि क्रोध दोहोंपासून मुक्त रहावे.

याचबरोबर कुभावनेचाही स्वास्थ्यावर वाईट परिणाम होतो.

# बीअर पिण्यापेक्षा बीअरने अंघोळ करण्याचे फायदे वाचून व्हाल चकित

बीअरमध्ये आढळणाऱ्या नैसर्गिक घटकांमुळे बीअर बाथमुळे त्वचेला अनेक फायदे मिळू शकतात. हॉप्स हा एक प्रमुख घटक आहे, त्यात दाहकविरोधी आणि जीवाणूंच्या वाढीस प्रतिबंध करणारा गुणधर्म असतो, जो त्वचेला नीट करू शकतो. त्याव्यतिरिक्त बीअरमधील यीस्टमध्ये व्हिटॅमिन बी असते, जे तुमची त्वचा गुळगुळीत करू शकते. बीअर एक नैसर्गिक एक्सफोलिएटरदेखील आहे, जे मृत त्वचेपासून मुक्त होण्यास मदत करू शकतात, असे केअर हॉस्पिटल्सच्या सल्लागार व त्वचारोगतज्ज्ञ डॉ. स्वप्ना प्रिया म्हणतात.



**बीअरमध्ये शरीराला निरोगी बनवणारे घटक आहेत का?**

बीअरमध्ये असे अनेक घटक असतात, जे बीअर जास्त प्रमाणात सेवन न केल्यास संभाव्य आरोग्यदायी फायदे देऊ शकतात, असे डॉ. प्रिया म्हणाल्या.

यीस्ट आणि हॉप्स वनस्पतींसह बीअरमध्ये पॉलीफेनॉलदेखील असतात, जे अँटीऑक्सिडंट्स आहेत आणि त्यामुळे शरीरातील मुक्त रॅडिकल्सपासून मुक्त होण्यास आपल्याला मदत मिळते, ज्यामुळे आपल्या शरीरातील पेशींचे नुकसान टाळता येते.

**बीअर बाथमुळेही ताण कमी होण्यासही मदत?**

बीअर बाथमुळे ताण कमी होण्यास आणि आराम मिळण्यास मदत होते. हॉप्स आणि माल्टच्या सुखदायक सुगंधासह गरम पाणी शांत वातावरण तयार करू शकते, ज्यामुळे ताण कमी होण्यास आणि विश्रांती मिळणयासाठी फायदा होतो. असे डॉ. प्रिया म्हणाल्या.

# पिण्याच्या पाण्यात चिमूटभर बेकिंग सोडा घेतल्यास शरीर डिटॉक्स होण्यास मदत

काही वर्षांपासून भारतातील शेती उद्योगात कीटकनाशकांचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे, ज्यामुळे आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होण्याची चिंता निर्माण झाली आहे. उत्पादनांवर अल्कधर्मी वॉश आणि सेंद्रिय लेबले लावली जात असली तरी कीटकनाशकांच्या विषारी परिणामांमुळे शास्त्रज्ञ चिंतेत आहेत.

अलीकडेच, इन्स्टाग्रामवर एक व्हायरल रील समोर आली आहे, त्यामध्ये असा दावा केला गेलाय की, पिण्याच्या पाण्यात चिमूटभर बेकिंग सोडा टाकल्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत होते. कारण त्यात ग्लायफोसेटची खूप जास्त ओढ असते, जी राउंडअप असते.

व्हिडीओमधील कंटेंट क्रिएटरच्या मते, तुम्ही जरी सेंद्रिय पदार्थ खाल्ले आणि फिल्टर केलेले पाणी प्यायले तरी ग्लायफोसेट हे एक असे न्यूरोटॉक्सिन आहे, जे लिम्फोमा, कर्करोग, पार्किन्सन आणि अगदी एमएस यांसारख्या गोष्टींशी जोडलेले आहे. या व्हिडीओत तिने हे विषारी पदार्थ बाहेर काढण्यासाठी दररोज पाण्यात एक चिमूटभर किंवा चमच्याचा आठवा भाग बेकिंग सोडा टाकण्याची शिफारस केली.



पॅकेजिंगवर एक नजर टाकल्यास दोन्ही उत्पादनांमधील फरक दिसून येतो. बेकिंग सोड्यात सोडियम हायड्रोजन कार्बोनेट हा एक घटक असतो. त्याला सोडियम बायकार्बोनेट किंवा फक्त बायकार्ब, असेही म्हणतात. बेकिंग सोडा स्वच्छता, स्वयंपाक आणि एक दुर्गंधीनाशक पदार्थ म्हणून वापरण्यासाठी प्रसिद्ध आहे.

आम्ही उत्सुकतेने याबाबतच्या काही स्पष्टतेसाठी आरोग्य तज्ज्ञांकडे वळलो.


चेन्नईतील प्रॅग्मॅटिक न्यूट्रिशनच्या मुख्य पोषणतज्ज्ञ मीनू बालाजी म्हणाल्या की, ग्लायफोसेट हे अनेक देशांमध्ये वापरले जाणारे तणनाशक आहे. पचन समस्या आणि कर्करोग होण्याचा धोका वाढण्याशी त्याचा संबंध असल्याने अलीकडच्या काळात त्यावर टीका झाली आहे .

काही अभ्यासांतून असे दिसून आले आहे की, बेकिंग सोडा उत्पादनाच्या पृष्ठभागावरून ग्लायफोसेट काढून टाकू शकतो. कारण- ग्लायफोसेट अल्कधर्मी माध्यमात स्थिर नाही; परंतु याचे आमच्याकडे ठोस वैज्ञानिक पुरावे नाहीत. जरी बेकिंग सोडा पृष्ठभागावरून ग्लायफोसेट काढून टाकत असला तरी ग्लायफोसेट एक तणनाशक आहे. याचा अर्थ असा की, ते ऊतींमध्ये आणि वनस्पतीच्या इतर भागांमध्येदेखील आढळते, असे ती म्हणाली.

ग्लायफोसेट काढून टाकण्याचे इतर कोणते मार्ग आहेत?

बालाजी यांनी नमूद केले की, ग्लायफोसेटच्या स्वरूपामुळे इतर मार्ग तितके प्रभावी नसले तरी काही फळे सोलून खाल्ली तर याबाबत मदत होऊ शकते. अँटीऑक्सिडंट्स आणि सल्फोराफेनसमृद्ध अन्न समाविष्ट केल्याने यकृताच्या कार्याला चालना देऊन हे विषारी पदार्थ काढून टाकता येतात. जर तुम्हाला दूषित नसलेले पदार्थ खायचे असतील, तर सेंद्रिय पदार्थ शोधा. तुम्ही ग्लायफोसेट रेसिड फ्री लेबल असलेली उत्पादनेदेखील तपासून पाहू शकता, असे त्या म्हणाल्या.

# टिकेसाठी कदाचित कारणे शोधावे लागते पण



माणूस अनेक भावना अनुभवतो, ज्यात प्रशंसाही महत्त्वाची असते. आपल्यातील दोष, दुर्गुण ऐकून कोणीही तणावात येतो तर प्रशंसेने त्याचा उत्साह दुणावतो; पण विनाकारण केलेल्या प्रशंसेने माणूस गर्विष्ठ व हट्टी होतो. तेच एखाद्यातील दोष सुधारण्यासाठी हुशारीने केलेल्या प्रशंसेला महत्त्वाचे स्थान असते.

कृती जेव्हा सासरी आली तेव्हा स्वयंपाकाबाबत अगदीच कच्ची होती. त्यामुळेच जेव्हा तिचे सासू-सासरे तिचे कौतुक करीत तेव्हा तिला मनातल्या मनात अपराधी असल्यासारखे वाटे. आपल्या सासुच्या मार्गदर्शनामुळे व पाककलेच्या पुस्तकांच्या मदतीने आज कृती एक उत्तम कुक आहे. ज्याचे संपूर्ण श्रेय ती आपल्या सासू-सासऱ्यांना देते. ती म्हणते की, जेव्हा ते माझ्या बेचव स्वयंपाकाची स्तुती करीत असत तेव्हा माझ्या मनात उत्तम स्वयंपाक करण्याची इच्छा निर्माण करीत असे व सतत उत्तम स्यंपाक करण्याची प्रेरणा देई.

सामान्यरूप असलेली गीता स्वत:च्या राहणीमानाबाबत खूपच निष्काळजी होती. त्यामुळे ती जास्तच बिचारी दिसे. आकर्षक व्यक्तिमत्त्व असलेल्या तिच्या पती राहूलने आपल्या पत्नीची बेपर्वाई पारखलीच नाही तर हुशारीने दूर ही केली. 'गीता तू मोठी बिंदी लावून कॉटन साडी व्यवस्थित नेसलीस ना की खूपच सुंदर दिसतेस बघ' राहूल छोट्या छोट्या गोष्टीबाबत पत्नीचे कौतुक करून तिला मंत्रमुग्ध करीत असे. साधी गीता पतीकडून सातत्याने होणाऱ्या कौतुकाने खरोखरच स्वत:ला आकर्षक समजू लागली व स्वत:ला सुधारू लागली. किट्टी पार्टीत जेव्हा तिला 'पार्टी क्वीन' चा पुरस्कार मिळाला तेव्हा तिने त्याचे श्रेय राहूलला दिले.

**IN THE COURT OF THE DISTRICT JUDGE-4 AND EX-OFFICIO MEMBER OF MOTOR ACCIDENT CLAIMS TRIBUNAL, LATUR, DISTRICT LATUR (MAHARASHTRA STATE)**

**NOTICE**

M.A.C.P. No. 289/2023.
Husen Vs.Ajit and others.
Exh.No.15.

To,
**RESPONDENT NO. 2**

**Umesh S/o Mahdeo Nirange,
Age: 40 Years, Occu.: Business,
R/o.: Flat No. A-508, Golden Palms,
Pune-Nashik Higway, Borade Wasti,
Moshi, Pune-412105
(Owner of Car No. MH-14/KS-4491**

Take notice that the petitioner, **Husain S/o. Jalal Shaikh, Age - 64 years, Occu.: Nil, R/o.: At present Zeneth Society, Latur** has made application to this tribunal claiming compensation U/Sec. 166 and 140 Motor Vechicle Act from you.

You being one of the above said respondent No.2 is hereby warned to appear before this tribunal in person or by a pleader duly instructed on the **Dated 07/07/2025** at 10.30 a.m. in District Judge-4 & Ex-Officio Member of M.A.C.T.,Latur.It show cause against the application, failing where in the said M.A.C.P.application will be heard and determined ex-parte.

Given under my hand and seal of this court this 24/04/2025.

Sign/-
Jr.Clerk
District Court-4,Latur.

By Order,
Sign/-
Asstt. Supdt.,
District Court, Latur.

**शिरूर नगरपरिषद, घोडनदी**
**पुणे-नगर रोड,ता.शिरूर,जि.पुणे-४१२२१०**
दूरध्वनी क्र.०२१३८-२२२१२२ ई-मेल : shirur.pune@gmail.com
टोल फ्री क्र.१८००२३३२१२३ वेबसाईट : shirurnagarparishad.org

शिरुर नगरपरिषद, जि. पुणे, शिरुर — दुरध्वनी क्रमांक ०२१३८/२२२१२२

शिरुर नगरपरिषदेच्या खालील कामासाठी तात्काळ स्वरूपात निविदा दर मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | बयाणा रक्कम | निविदा अर्जाची किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | शिरुर नगरपरिषद हद्दीतील ढोर आळी येथील उर्वरित पेवर ब्लॉक बसविणेचे काम करणे | ५९२६/- | ५००/- | १ महीने |
| २ | नगरपरिषद हद्दीतील उद्यानामद्धे व ओपन जीमच्या ठिकाणी बसविणेत आलेल्या खेळणी दुरूस्त करणे व स्पेसिफिकेशन नुसार पुरवठा करणे. | २०००/- | ५००/- | १२ महिने |

अटि व शर्ती:-
१. विहित नमुन्यातील निविदा सूचना फॉर्म शिरुर नगरपरिषद कार्यालयात **दिनांक २९/०४/२०२५ ते दिनांक ०७/०५/२०२५** पर्यंत कामाच्या दिवशी दुपारी ५.०० वाजे पर्यंत रोखीने भरणा करुन विकत मिळतील.
२.वरील सर्व माहितीनिसी निविदा **दिनांक ०७/०५/२०२५** रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत नमूद केलेल्या दिनांकास व वेळेत मा. मुख्याधिकारी शिरुर नगरपरिषद यांचे नावे सादर करावयाची आहे.
३. प्राप्त झालेल्या निविदा शक्यातो **दिनांक ०८/०५/२०२५** रोजी दुपारी १.०० वाजता उपस्थित पुरवठादारा समक्ष उघडण्यात येतील.

सही/-
नगर अभियंता
शिरूर नगरपरिषद, घोडनदी

सही/-
मुख्याधिकारी
शिरूर नगरपरिषद, घोडनदी

**नमूना ३**

**खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्यासाठी जमीन मालक किंवा हितसंबंधीत व्यक्तीकडून हरकती / सूचना मागविण्याबाबत जाहीर नोटीस**

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १), पुणे
जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, बी विंग,
पहिला मजला, पुणे- ४११००१
क्रमांक - भूसंपादन/कावि/ ३४ /२०२५
दिनांक २५/४/२०२५

ज्याअर्थी, संपादन संस्था - कार्यकारी अभियंता (मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग प्रकल्प), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या), शिबीर कार्यालय, पुणे यांनी मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग क्षमतावाढ प्रकल्पासाठी भूसंपादन या सार्वजनिक प्रयोजनासाठी महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ मधील तरतुदींस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या) यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर केला आहे;

ज्याअर्थी,जिल्हाधिकारी, पुणे यांचे आदेश क्र.पीएलसी/सीआर/३३/२०२५, दि.०६.०३.२०२५ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ आणि तद्अनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभागाकडील परिपत्रक क्रमांक एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५ जानेवारी, २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत;

आणि ज्या अर्थी, उक्त जाहीर नोटीसीद्वारे संबंधीत जमीन धारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या) यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागविण्यात आलेली आहेत;

त्याअर्थी, आता

१. मी, श्री. कल्याण पांढरे, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १) (मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग) पुणे, जिल्हा- पुणे याद्वारे, अनुसूची- एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या) यांचे नावे खरेदी करण्यात येणार असल्याने,या अनुसूचीमध्ये नमूद सव्हे नंबर/गट नंबरमधील जमीनीच्या मालकी हक्कांबाबत व न्यायालयीन दाव्यांबाबत जमीन मालकांकडून किंवा हितसंबंधीत व्यक्तींकडून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत हरकती किंवा सूचना विहीत नमूना ४ मध्ये मागवित आहे किंवा त्यांना माझ्यासमोर उपस्थित राहण्यास सांगत आहे.

२. हरकती किंवा सूचनांचा विहीत नमूना ४ ची प्रत १) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.१), (मुंबई- पुणे द्रुतगती मार्ग),पुणे बी विंग,पहिला मजला,जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे/ २) कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या), शिबीर कार्यालय, पुणे यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमूना या कार्यालयामार्फत / महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत संबंधीतांना उपलब्ध करून देण्यात येईल.

३. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.१), पुणे यांच्या कार्यालयामध्ये व महामंडळाच्या प्राधिकृत अधिका-यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत जमीन धारकांना किंवा हितसंबंधीत व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

४. ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत जमीनीच्या मालकी हक्कांबाबत व न्यायालयीन दाव्यांबाबत जमीन मालकांकडून किंवा हितसंबंधीत व्यक्तींकडून प्राप्त झालेल्या हरकतींची किंवा सूचनांची चौकशी करण्यात येईल आणि संबंधीत हरकत घेणाऱ्यांना त्यांच्या हरकतींच्या किंवा सूचनांच्या समर्थनार्थ तोंडी व कागदोपत्री पुरावा सादर करण्यासाठी जातीने किंवा वकिलामार्फत किंवा कायदेशीर व्यक्तीमार्फत उपस्थित राहण्याची मुभा असेल.

५. उक्त कालावधीमध्ये हरकती किंवा सूचना प्राप्त न झाल्यास, उक्त जमिनीबाबत अन्य कोणत्याही व्यक्तीचे हितसंबंधीत नाहीत असे गृहीत धरून, कायदेशीर शिर्षक अहवालाच्या अनुषंगाने जमीन धारकांकडून उक्त जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

अनुसूची- एक
खरेदी द्यावयाच्या जमीनीचा तपशील

| गाव मौजे ब्राम्हणवाडी, | ता. मावळ, | | जि. पुणे |
|---|---|---|---|
| अ.क्र. | गट क्रमांक / भूमापन क्रमांक | भूधारणा पद्धती | क्षेत्र (हे. आर) |
| १ | २९२ पै. | वर्ग-१ (जिरायत) | ०.९१८३ |
| २ | २९३ पै. | वर्ग-१ (जिरायत) | ०.०७०० |

ठिकाण : पुणे
दिनांक २५/४/२०२५

सही/-
(कल्याण पांढरे)
उपजिल्हाधिकारी
(भूसंपादन क्र. १), पुणे

जिमाका / पुणे / जहिरात / ६०/२०२५ - २०२६

# कला विश्व



## अक्षय कुमारच्या ‘केसरी २’ला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद

बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमार ‘केसरी : चाप्टर २’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. अक्षय कुमारबरोबरच या चित्रपटात आर माधवन व अनन्या पांडेदेखील प्रमुख भूमिकेत आहे.आता ‘केसरी: चाप्टर २’ने बॉक्स ऑफिसवर १० व्या दिवशी किती कमाई केली हे जाणून घेऊ. चित्रपट प्रदर्शित झाल्याच्या दुसऱ्या रविवारी केसरी २ ने ८.१५ कोटींची कमाई केली. गेल्या रविवारी चित्रपटाने १२ कोटींची कमाई केली होती. त्यानंतर ही सर्वात जास्त कमाई आहे. पहिल्या आठवड्यात या चित्रपटाने एकूण ४६.१ कोटींची कमाई केली. शुक्रवारी ४.०५ कोटी, शनिवारी ७.१५ कोटी; तर रविवारी ८.१५ कोटींची कमाई केली. अशाप्रकारे आतापर्यंत या चित्रपटाने देशांतर्गत ६५.४५ कोटींची कमाई केली आहे. तर जगभरातील चित्रपटाच्या कमाईबाबत बोलायचे तर लवकरच हा चित्रपट १०० कोटींच्या क्लबमध्ये पोहोचेल, असे म्हटले जात आहे.

यावर्षी प्रदर्शित झालेल्या बॉलीवूड चित्रपटांमध्ये कमाईच्या बाबतीत केसरी २ पाचव्या क्रमांकावर आहे. प्रदर्शित झाल्यानंतर चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर दहाव्या दिवशी ८.१५ कोटींची कमाई केली. ‘जाट’ चित्रपटाने १० व्या दिवशी ३.७५ कोटींची कमाई केली होती. ‘सिंकदर चित्रपटाने प्रदर्शित झाल्यानंतर दहाव्या दिवशी १.५ कोटींची कमाई केली होती; तर ‘स्काय फोर्स’ने ५.५ कोटींची कमाई केली होती.

अक्षय कुमारच्या या ‘केसरी २’ चित्रपटाने कमाईच्या बाबतीत सनी देओलच्या ‘जाट’, तसेच तमिळ चित्रपट ‘गुड बॅड अग्ली’, ‘थंडरम’ या मल्याळम सिनेमांना मागे टाकले आहे. मात्र, आता १ मे रोजी अजय देवगण व रितेश देशमुख यांची प्रमुख भूमिका असलेला ‘रेड २’ हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचा ‘केसरी २’च्या कमाईवर परिणाम होऊ शकतो. आता ‘केसरी: चाप्टर २’ आणखी किती कमाई करणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, अक्षय कुमार याआधी ‘स्काय फोर्स’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटालादेखील प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला होता. याआधी अक्षय कुमारचे काही सलग चित्रपट फ्लॉफ ठरले. ज्यामध्ये ‘बडे मियाँ छोटे मियाँ’, ‘सरफिरा’, ‘खेल खेल में’, ‘सिंघम अगेन’ हे त्याचे चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरले होते. आता ‘स्काय फोर्स’ आणि ‘केसरी २’ या चित्रपटांना प्रेक्षकांचे प्रेम मिळताना दिसत आहे.



## हेरा फेरीतील भूमिका माझ्यासाठी अडचणीची ठरली, परेश रावल यांचं वक्तव्य

प्रत्येक कलाकाराला आपल्याला वैविध्यपूर्ण भूमिका मिळाव्यात, असं वाटत असतं.एकाच पठडीतल्या भूमिका न करता, वेगळा ठसा उमटवणाऱ्या भूमिकांच्या माध्यमातून प्रेक्षकांनी आपल्याला ओळखावं, असं अनेकांना वाटत असतं. परंतु, फार कमी कलाकारांना अशी संधी मिळते. विशेषत: विनोदी भूमिका करणाऱ्या कलाकारांसाठी हा प्रवास आनखी आव्हानात्मक ठरतो. त्यामुळे बऱ्याचदा कलाकार मंडळी याबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना दिसतात.

अशातच आता बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेते परेश रावल यांनीदेखील त्यांच्या ‘हेरा फेरी’ या प्रसिद्ध चित्रपटातील गाजलेल्या ‘बाबूराव’ या भूमिकेबद्दल मत व्यक्त केलं आहे. ‘लल्लनटॉप’ला दिलेल्या मुलाखतीमध्ये त्यांनी असं म्हटलं आहे, ‘हेरा फेरी’ या चित्रपटात मी साकारलेली भूमिका माझ्या गळ्याभोवतीचा फास झाला होता. सगळे जण फक्त त्या एका भूमिकेबद्दलच माझ्याशी बोलायचे आणि त्यामुळे मी एकदा २००६ साली ‘फिर हेरा फेरी’ प्रदर्शित झाल्यानंतर विशाल भारद्वाज यांना भेटायला गेलो. आणि त्यांना मला या वेशातली दुसरी भूमिका द्या फक्त ती यापेक्षा वेगळी द्या, असं म्हटलं होतं. त्यावर त्यांनी मी पात्रांचा रिमेक करीत नाही, असं उत्तर दिलं. त्यानंतर मी २०२२ साली आर. बल्की यांनाही तीच विनंती केली. कारण या भूमिकेमुळे मला विशिष्ट प्रकारच्या भूमिकेत अडकल्यासारखं वाटायचं आणि मी एक कलाकार आहे. त्यामुळे मला कायम वेगवेळे प्रयोग करायला आवडतं.

पुढे परेश यांनी ‘हेरा फेरी’ व ‘फिर हेरा फेरी’ या चित्रपटांची तुलना ‘लगे रहो मन्ना भाई’ व ‘मुन्ना भाई एम.बी.बी.एस.’ या चित्रपटाशी केलेली पाहायला मिळालं. त्याबद्दल बोलताना त्यांनी असं म्हटलं आहे, जेव्हा एखाद्या चित्रपटाचा दुसरा भाग काढला जातो तेव्हा त्यामध्ये त्याच त्या गोष्टी पाहायला मिळतात. यापूर्वी सुद्धा परेश यांनी ‘हेरा फेरी’मुळे नाखुश असल्याचं म्हटलं होतं. सिद्धार्थ कननला दिलेल्या मुलाखतीमध्ये त्यांनी सांगितलं होतं, फिर हेरा फेरी हा चित्रपट तितका चांगला नव्हता झाला. ‘हेरा फेरी’ हा चित्रपट बॉलीवूडमधील सुपरहिट चित्रपटांपैकी एक आहे. आजही या चित्रपटाची क्रेझ कायम असून, अनेक जण तितक्याच आवडीने हा चित्रपट बघताना दिसतात. चित्रपटात अक्षय कुमार, सुनील शेट्टी, परेश रावल या त्रिकुटाची जबरदस्त जुगलबंदी बघायला मिळते. त्यामुळे चित्रपटाचा वेगळा चाहतावर्ग आहे. चित्रपटातील संवाद आजही अनेकदा मिमसाठी वापरले जातात. ‘हेरा फेरी’, ‘फिर हेरा फेरी’ या दोन्ही चित्रपटांनी प्रेक्षकंना पोट धरून हसवलं. त्यामुळे चित्रपटलाही प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. अशातच आता या चित्रपटाचा तिसरा भाग लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# विकासाच्या ‘इकोसिस्टीम’मुळे महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ गेम चेंजर ठरणार

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांच्या विकासाची कामे सुरू आहेत. त्यामध्ये रस्ते, रेल्वे, बुलेट ट्रेन, जलमार्ग आदींसह बंदर आणि विमानतळ विकासाच्या कामांचा समावेश आहे. या संपूर्ण विकासाच्या ’ इकोसिस्टीम’मुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. महाराष्ट्र विकासाच्या बाबतीत देशाचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

हॉटेल फोर सीजन येथे इंडिया मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक कॉरिडर समिट – २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत सीएनबीसी टीव्ही १८ वृत्तवाहिनीच्या संपादक शिरीन भान यांनी घेतली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेनचे काम गतीने सुरू आहे. या ट्रेनने २०२८ पर्यंत प्रवास करणे शक्य होणार आहे. वाढवण बंदराजवळ बुलेट ट्रेनचे स्थानक निर्माण करण्यात येणार आहे. मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर पायाभूत सोयीसुविधांच्या विकासाची कामे सुरू आहेत. सागरी किनारा रस्ता, अटल सेतू, विविध मेट्रो मार्गांची कामे ही त्यातली ठळक उदाहरणे आहेत. या सर्व विकास कामांमुळे मुंबईत गुंतवणूक ५० बिलियन डॉलरपर्यंत जाणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे प्रकल्प गेम चेंजर ठरणारे आहेत. यासोबतच पुणे येथील नवीन विमानतळ, शिर्डी, नागपूर विमानतळाच विकास, नदी जोड प्रकल्प, बुलेट ट्रेन प्रकल्प महत्त्वाची भूमिका



बजावणार आहेत.

सागरी किनारा रस्ता विरारपर्यंत वाढविण्यात येत आहे. वाढवण बंदर हे सध्या अस्तित्वात असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्टपेक्षा तीन पट मोठे आहे. या बंदराला प्रवेश नियंत्रित असलेल्या महामार्गाने नाशिकपर्यंत जोडण्यात येऊन पुढे समृद्धी महामार्गाला जोडण्यात येईल. वाढवण बंदराजवळ नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ निर्माण करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच या परिसरात चौथ्या मुंबईचेही निर्माण करण्यात येणार आहे. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात पुरामुळे वाहून जाणारे पाणी तसेच पश्चिम घाटातून समुद्रात वाहून जाणारे पाणी उजनी धरण व मराठवाड्यात वळविण्यात येणार आहे. यावर राज्य शासन काम करीत आहे. त्यामुळे भविष्यात मराठवाडा निश्चितच दुष्काळमुक्त होणार आहे. समृद्धी महामार्ग’ नंतर राज्यात नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्ग’ निर्माण करण्यात येणार आहे. महाराष्ट्र हे नेहमी भविष्यासाठी ’ रेडी ’ असणारे राज्य आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले, राज्यात गुंतवणूकदारांना सोयी सुविधा मिळण्यासाठी व गतीने गुंतवणूक येण्यासाठी इज ऑफ डुईंग बिजनेस’ मध्ये राज्य मोठी झेप घेत आहे. २०२९ मध्ये महाराष्ट्र ’इज ऑफ डुईंग बिजनेस’ मध्ये पहिला असेल. गुंतवणूकदारांच्या सुविधेसाठी मैत्री पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून ’ सिंगल विंडो सिस्टीम ’ कार्यान्वित करण्यात आली आहे. गुंतवणूकदारांना सिंगल विंडो सिस्टीममुळे उद्योग स्थापन करण्यास सुलभता येत आहे.

दळणवळणाच्या सोयी सुविधांचा होणाऱ्या विकासामुळे राज्यात मालवाहतूक गतीने करण्यात येत आहे. नागपूरपर्यंत आठ तासांमध्ये जवाहरलाल नेहरू बंदरापासून जाता येते. वाढवण बंदरामुळे यामध्ये आणखी गतिमानता येणार आहे. नागपूर येथे कार्गो हब विकसित करण्यात आले आहे. यासोबतच पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरही कार्गो हब विकसित करण्यात येत आहे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी विकासाचा आलेख मांडला.

# सीईटी परिक्षेतील घोटाळ्याची चौकशी करा; पेपरमधील चुकांचे गुण विद्यार्थ्यांना द्या

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून मागणी

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र सरकारने राज्य सामाईक परिक्षा (एमएचटी सीईटी) सेल यांच्या माध्यमातून रविवार दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी परीक्षा घेतली. पण या परिक्षेतील घोळामुळे विद्यार्थी व पालकांची चिंता वाढवली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील केंद्रावर ५० गुणांच्या गणिताच्या पेपरमध्ये २० ते २५ प्रश्नांसाठी उत्तराचे पर्याय चुकीचे होते अशी तक्रार विद्यार्थ्यांनी केली आहे. हा अतिशय गंभीर प्रकार असून विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान न करता त्यांना या प्रश्नांचे गुण द्यावेत, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणतात की, गणिताच्या ५० प्रश्नांमधील २० ते २५ प्रश्नांच्या उत्तराचे पर्याय चुकीचे होते, काही प्रश्नांचे चारही पर्याय चुकीचे होते पण विद्यार्थ्यांना सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक असल्याने त्यांना नाईलाजाने चुकीचे पर्याय निवडावे लागले. याबाबत विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्राकडे तक्रार केली असता त्यांची साधी दखलही घेतली नाही. अशाच प्रकारचा घोळ राज्यातील इतर परीक्षा केंद्रावर झाल्याच्या तक्रारी आहेत. काही परीक्षा केंद्रावर सर्व्हर डाऊन झाल्याच्या तक्रारीही आल्या आहेत पण परिक्षा केंद्राकडून समाधानकारक उत्तरे मिळाले नाहीत.

अभियांत्रिकी प्रवेशासाठी ही परीक्षा महत्वाची असून तब्बल २० ते २५ प्रश्नांचे पर्यायच चुकीचे दिले असतील तर विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होऊ शकते, याला जबाबदार कोण? पेपर काढणे व परिक्षा घेण्याची जबाबदारी असलेल्या संस्था वा कंपनीच्या चुकीची शिक्षा विद्यार्थ्यांनी का भोगायची? हा विषय केवळ काही प्रश्नांचा नसून हजारो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा आहे. राज्य सरकारने हे प्रकरण गांभिर्याने घ्यावे व ज्यांना हे काम होते त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. ज्या संस्थेला पेपर काढता येत नाही, परिक्षांचे नियोजन व्यवस्थित करता येत नाही अशांना पुन्हा कोणत्याही परिक्षेचे काम देऊ नये, त्यांना काळ्या यादीत टाकावे. कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याची सर्व जबाबदारी राज्य सरकारची आहे.

# एसटी महामंडळाची आर्थिक श्वेतपत्रिका काढा : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती समजून घेण्यासाठी, तसेच भविष्यातील नियोजना करता, एक आर्थिक श्वेतपत्रिका तयार करावी. असे निर्देश परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष श्री. प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत.

आज एसटीच्या मुख्यालयात झालेल्या बैठकीमध्ये ते बोलत होते. यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा



अधिकारी गिरीश देशमुख यांचे सह सर्व खात्याचे प्रमुख उपस्थित होते. ते पुढे म्हणाले,सुमारे १० हजार कोटी संचित तोटा सहन करणाऱ्या एसटी महामंडळाला कर्मचाऱ्यांचे वेतन, वाहन खरेदी, टायर खरेदी, इंधन खरेदी, स्थानकाचे नूतनीकरण व इतर आस्थापना खर्चासाठी दररोज आर्थिक कसरत करावी लागते.

# मुंबईत ‘वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट’चे भव्य आयोजन

## पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्घाटनासाठी उपस्थित राहणार : मंत्री उदय सामंत

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : मुंबई बीकेसी येथील जियो वर्ल्ड सेंटर येथे १ मे पासून ४ मे २०२५ पर्यंत वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट’चा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमाचे १ मे रोजी उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज बीकेसी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाकडे असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे. पंतप्रधान मोदी १ मे रोजी संपूर्ण दिवसभर मुंबईत उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या सोबत परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचाही सहभाग राहणार आहे.

उद्योग मंत्री सामंत यांनी यावेळी स्पष्ट केले की, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे. विशेषत: हिंदी चित्रपटसृष्टीचे माहेरघर हे मुंबईला म्हटले जाते. भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांनी याच महाराष्ट्रामध्ये मराठी चित्रपट सुरू केले. त्यामुळे मनोरंजनाच्या क्षेत्रात मुंबई ही देशात अग्रगण्य शहर आहे. त्याचबरोबर, गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक ही एक नंबरला आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रात देखील महाराष्ट्र आणि मुंबई एक नंबरला राहिलेले आहे. पर्यटनाच्या दृष्टीने देखील महाराष्ट्र या देशाच्या पातळीवर अन्य देशांशी स्पर्धा करतो आहे. म्हणून पर्यटनाची सगळी स्थळे जागतिक पातळीवर जावी, हा देखील या वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट’चा उद्देश आहे. तसेच महाराष्ट्राची संस्कृती, महाराष्ट्राची सांस्कृतिक संस्कृती, औद्योगिक संस्कृती, पर्यटन संस्कृती आणि ज्या काही महाराष्ट्राच्या परंपरा आहेत, त्या जागतिक पातळीवर जाव्यात, यासाठी मुंबई शहराची निवड केंद्र शासनाने केलेली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

उद्योग मंत्री सामंत यांनी सांगितले की, या कार्यक्रमात ३३ देशांतील मंत्री व मंत्रीस्तरीय अधिकारी, तसेच १२० आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# बीजे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एक हजार क्षमतेचे नवीन पदव्युत्तर विद्यार्थी वसतीगृह उभारण्यास तत्वत: मान्यता

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : पुण्यातील बी. जे.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय हे स्वातंत्र्यापूर्वीपासूनचे राज्यातील नामवंत असे शासकीय महाविद्यालय आणि रुग्णालय आहे. त्यामुळे येथील ऑडिटोरियमचा पुनर्विकास करताना त्याचा हेरिटेज दर्जा कायम राखून तो महाविद्यालयाच्या लौकिकास साजेसा व्हावा. त्यासाठी तातडीने एकात्मिक विकास आराखडा सादर करावा असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी दिले.

पुणे येथील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या ऑडिटोरियमच्या पुनर्विकासाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या मंत्रालयातील समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, बी जे वैद्यकीय महाविद्यालयात अनेक विद्यार्थी वैद्यकीय पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिक्षण घेत आहेत. येथील महात्मा गांधी सभागृहामध्ये (ऑडिटोरियम) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे विविध सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रम तसेच राज्यस्तरीय कार्यक्रम घेण्यात येतात. परंतु सद्यस्थितीत या कार्यक्रमांसाठी महात्मा गांधी सभागृहाची आसन क्षमता अपुरी पडत आहे. या सभागृहात ५०० विद्यार्थ्यांची आसनक्षमता आहे. तथापि या ठिकाणी सुमारे १५०० विद्यार्थी शिकत आहेत. त्यामुळे या सभागृहाचा पुनर्विकास करून पंधराशे आसन क्षमतेचे सुसज्ज सभागृह निर्माण करण्यात यावे.

यावेळी हेरिटेज वास्तू विशारद आभा लांबा यांनी ऑडिटोरियमच्या पुनविकासाबाबत सादरीकरण केले. एक हजार विद्यार्थी क्षमतेच्या नवीन पदव्युत्तर वसतीगृहाच्या निर्मितीस तत्वत: मान्यता वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरातच एक हजार विद्यार्थी क्षमतेचे पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठीचे वसतिगृह बांधण्यासही या बैठकीत तत्वत: मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे बी जे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय होणार आहे.

# शासनाच्या सर्व सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन करण्याचे निर्देश

## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीची दशकपूर्ती’ आणि प्रथम सेवा हक्क’ दिनानिमित्त राज्यस्तरीय सोहळा संपन्न

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अधिकाधिक लोकाभिमुख झाला पाहिजे यासाठी प्रयत्न करावेत. १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत शासनाच्या सर्व सेवा ऑनलाईन करण्यात याव्यात. शासनाचा जो विभाग १५ ऑगस्टपर्यंत त्यांच्या सेवा ऑनलाईन होणार नाहीत, त्या विभागाला दर दिवशी प्रत्येक सेवेकरिता एक हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. शासनाकडून कोणत्या सेवा नागरिकांना दिल्या जातात याची शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना या विषयाबाबत माहिती व्हावी यासाठी या अधिनियमाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे सामान्य प्रशासन विभाग (प्रशासकीय नावीन्यता, उत्कृष्टता व सुशासन) आणि महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीची दशकपूर्ती आणि प्रथम सेवा हक्क दिन निमित्त राज्यस्तरीय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव, आयोगाचे नवनियुक्त ब्रँड ॲम्बेसेडर पद्मश्री शंकर महादेवन, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, माजी राज्य सेवा हक्क मुख्य आयुक्त स्वाधीन क्षत्रीय, राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण बलदेव सिंह, पुणेचे राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त दिलीप शिंदे यासह प्रशासनातील ज्येष्ठ वरिष्ठ सनदी अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सध्या १००० पेक्षा जास्त सेवा या कायद्याच्या अंतर्गत अधिसूचित केल्या आहेत. जवळपास ५८३ सेवा ऑनलाईन दिल्या जात आहेत. अजून ३०६ सेवा या ऑनलाइन आणायच्या आहेत तर १२५ सेवा ऑनलाईन आहेत पण त्या कॉमन पोर्टलवर उपलब्ध नाहीत आणि म्हणून शासनाच्या सर्व विभागांना १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत सर्व सेवा ऑनलाईन कराव्यात.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे मूलभूत अधिकार संविधानात समाविष्ट केले हे मूलभूत अधिकार सर्वांना मिळाले पाहिजेत. गेल्या १० वर्षात तंत्रज्ञानाच्या गतीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात फरक पडलेला आहे आणि म्हणून या सेवा अधिक गतिमान पद्धतीने करण्यासाठी आपण प्रयत्न करत आहोत. मंत्रालयात चेहरा पडताळणी पमुळे देखील निम्मी गर्दी कमी झाली आहे. जीवनामध्ये इज ऑफ लिव्हिंग’ आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. शासनाच्या सर्व सेवा व्हॉटसप वर तसेच सर्व माहिती संकेतस्थळावरती उपलब्ध झाल्यास अनेक तक्रारी कमी होऊन लोकांचे जीवनमान सुसह्य होईल, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, लोकशाहीत लोकांसाठी कर्तव्य भावनेने काम करायचे असते. लोकसेवा हा केवळ कायदा नाही तर ती एक उदात्त भावना आहे असे आपण म्हणतो या वाक्याला लोकसेवा हक्क आयोगाने खरा अर्थ मिळवून दिला आहे. हा कायदा म्हणजे खऱ्या अर्थाने लोकशाहीची गंगोत्री आहे. वर्धा, यवतमाळ आणि कोल्हापूरच्या जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यात नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले त्यांचा सत्कार करण्यात आला. अशाच प्रकारे इतर जिल्ह्यातही काम केले जावे. हा कायदा प्रशासन व नागरिकांमधला विश्वासाचा एक पूल आहे, म्हणून सर्वसामान्य जनतेच्या सक्षमीकरणाचा हा पाया अधिक मजबूत होऊन या अधिनियमाच्या माध्यमातून नागरिकांना तात्काळ सेवा मिळाव्यात असे त्यांनी यावेळी सांगितले.

* संपादक – संजय प्रल्हाद भोकरे * सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. एम्बसी सेंटर, प्लॉट नं. २०७, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई, ४०००२१. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०–२५४२४२३२ E-mail : sanjmaha@gmail.com